सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २८४ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि. १६ डिसेंबर २०२५ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## ‘मनरेगा’तून महात्मा गांधींचे नाव का हटवले?

### नवीन कायद्यावरून विरोधी पक्षांचा तीव्र आक्षेप



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६नवी दिल्ली**

नवी दिल्ली संसदेच्या हिवाळी अधिवेशनात सोमवारी लोकसभा व राज्यसभेचे कामकाज सुरू होताच रविवारी दिल्लीत आयोजित काँग्रेसच्या सभेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविरुद्ध देण्यात आलेल्या आक्षेपार्ह घोषणांचा मुद्दा उपस्थित झाल्याने दोन्ही सभागृहांत प्रचंड गदारोळ झाला, सत्ताधारी सदस्यांनी काँग्रेस नेत्यांनी यावर माफी मागावी, अशी मागणी केली. विरोधी पक्ष सदस्यांनी सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांचे मुद्दे खोडून काढण्याचा प्रयत्न केला.

याशिवाय ’मनरेगा’चे नाव बदलून यातून महात्मा गांधी यांचे नाव वगळले जाणार असल्याच्या मुद्द्यावरही दोन्ही सभागृहांत गोंधळ झाला. महात्मा गांधी ग्रामीण रोजगार योजनेऐवजी आता केंद्र सरकार नवीन योजनेसाठी कायदा आणणार आहे. यावर विरोधी पक्षांनी तीव्र आक्षेप घेतला. या मुद्द्यांवरून दोन्ही सभागृहांचे कामकाज दुपारपर्यंत तहकूब करण्यात आले.

लोकसभेत संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजीजू यांनी तर राज्यसभेत जे. पी. नड्डा यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींविरोधी घोषणांचा मुद्दा उपस्थित करून काँग्रेस नेतृत्वाने यावर संसदेत माफी मागावी, अशी मागणी केल्याने गदारोळ झाला.

**काय आहे प्रकरण?**

रविवारी रामलीला मैदानावर आयोजित विरोधी पक्षांच्या सभेला जाणाऱ्या काही काँग्रेस कार्यकर्त्यांनी मोदीविरोधी आक्रमक घोषणा दिल्या होत्या. याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आणि याचे पडसाद संसदेच्या दोन्ही सभागृहांत उमटले.

**आरोप फेटाळले**

राजकीय विरोधकांबद्दल असभ्य भाषा वापरणे, ही काँग्रेसची परंपरा नाही. पंतप्रधान मोदींबाबत सत्ताधारी सदस्यांनी केलेले आरोप निराधार असल्याचे पक्षाचे सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल यांनी म्हटले आहे. काँग्रेसच्या यशस्वी जाहीर सभेमुळे भाजपने हे नाट्य रचल्याची टीका त्यांनी केली.




## शौर्य पाटील आत्महत्या प्रकरणी एसआयटी नेमणार - गृहमंत्री अमित शहा

### मविआचे खासदार गृहमंत्र्यांच्या भेटीला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६नवी दिल्ली**

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील हे दिल्ली दौऱ्यावर असून त्यांनी शाळकरी मृत शौर्य पाटील या विद्यार्थ्याच्या कुटुंबाची भेट घेतली. या प्रकरणात केंद्र सरकारने तात्काळ कारवाई करावी, दोषी शिक्षकांवर कारवाई करावी, तसेच संबंधित शाळेची मान्यता रद्द करावी अशी मागणी मनोज जरांगे यांनी केली आहे. येथील पत्रकार परिषदेत जरांगे पाटील यांनी थेट केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना सवाल केले आहेत. दरम्यान, दुसरीकडे महाराष्ट्रातील खासदारांनी अमित शाह यांची भेट घेत शौर्य पाटील मृत्यूप्रकरणात चौकशीची मागणी केली. त्यावेळी, अमित शाह यांनी शौर्य पाटील आत्महत्या प्रकरणी डखढ नेमण्याचं आश्वासन दिलं.

एकीकडे मनोज जरांगे पाटील हे शौर्य पाटीलच्या कुटुंबीयांची भेट घेत असताना दुसरीकडे मविआचे खासदार अमित शाहांना भेटले आहेत. त्यावेळी, अमित शाह यांनी तात्काळ एसआयटी नेमण्याचे आश्वासन दिले. उद्याच विशेष तपास पथक नेमण्याबाबत सूचना देतो, असे अमित शाह यांनी म्हटले. खासदार निलेश लंके यांच्याकडून अमित शाह यांना पत्र देण्यात आलं असता, याबाबत माझ्याकडे शरद पवार यांचेही पत्र आल्याचे अमित शाह यांनी सांगितले.

याप्रकरणी मनोज जरांगे पाटील यांनीही भूमिका मांडली. सरकारने नेमलेल्या समितीने अहवाल दिलेला आहे, त्यानुसार या घटनेला, शौर्यच्या मृत्यूला शाळा आणि शिक्षकच जबाबदार आहेत. त्यामुळे, या अहवालानुसार तरी अमित शाह यांनी पाटील कुटुंबीयांवर मरणोत्तर अन्याय होऊ देऊ नये, असेही जरांगे पाटील यांनी म्हटले.

## शासनाचा मोठा निर्णय! शैक्षणिक प्रतिज्ञापत्राचे मुद्रांक शुल्क माफ; आर्थिक ताण कमी होणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६नागपूर**

गेल्या वर्षी १६ ऑक्टोबरपासून मुद्रांक शुल्कात वाढ करण्याचा निर्णय सरकारकडून घेण्यात आला. यानुसार, सर्व व्यवहारांसाठी भराव्या लागणाऱ्या मुद्रांक शुल्काची रक्कम किमान १०० वा २०० पासून थेट ५०० रुपये करण्यात आली. त्याचा थेट परिणाम विद्यार्थ्यांवरदेखील झाला. विद्यार्थ्यांना लागणाऱ्या वेगवेगळ्या प्रमाणपत्रांसाठी मुद्रांक शुल्क भरावे लागते.

प्रवेश घेताना, परीक्षा अर्ज भरताना किंवा इतर कोणत्याही प्रमाणपत्राची मागणी करताना विद्यार्थ्यांना ही स्टॅम्प ड्युटी भरावी लागत होती. आता त्यातून विद्यार्थ्यांची सुटका होणार आहे.

शैक्षणिक कामकाजासाठी लागणाऱ्या सर्व प्रकारच्या प्रतिज्ञापत्रासाठी जोडावे लागणारे



५०० रुपयांचे मुद्रांक शुल्क माफ करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. राज्यभरातील लाखो विद्यार्थ्यांसह कोट्यवधी नागरिकांना या निर्णयाचा दिलासा मिळाला असून विद्यार्थी आणि पालकांवरील आर्थिक ताण आता कमी होणार आहे.

या निर्णयाबाबत माहिती देताना महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी माहिती दिली. ‘कुठल्याही शैक्षणिक कामासाठी जात प्रमाणपत्र , उत्पन्नाचा दाखला , रहिवासी प्रमाणपत्र , नॉन क्रीमिलेयर अथवा राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र तसेच शिक्षणाकरिता महसूल विभागाकडून जी प्रमाणपत्र लागतील त्याला कुठलेही मुद्रांक शुल्क लागणार नाही. हा निर्णय विद्यार्थी आणि पालकांसाठी महत्त्वपूर्ण आहे. या निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात येईल.

साधारणतः दहावी बारावीचा निकाल जाहीर झाल्यानंतर हे दाखले मिळवावे लागतात. यासाठी पालकवर्ग तहसील कार्यालयात जाऊन दाखले मिळवतात. प्रत्येक दाखल्यासाठी ५०० रुपये याप्रमाणे सुमारे तीन हजार रुपये यासाठी पालक खर्ची घालतात. नव्या निर्णयामुळे पालकांचा हा आर्थिक भुर्दंड वाचणार आहे. साध्या कागदावर अर्ज लिहून तो सेतू कार्यालयामार्फत तहसील कार्यालयात द्यावा लागेल. त्यानंतर लागलीच दाखले मिळतील.

## मुख्यमंत्री फडणवीस म्हणतात अभ्यास करू; काय आहे हे ‘बोमा’ तंत्रज्ञान जे हेलिकॉप्टरच्या माध्यमातून

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ वर्धा**

राज्याचे मुख्यमंत्री जेव्हा एखाद्या विषयाचा अभ्यास करून निर्णय घेण्याचे सुतोवाच करत असतील तर तो विषय नक्कीच गंभीर समजला पाहिजे. कारण त्यात अनेकांचे हित गुंतलेले असते. मानव - वन्यजीव यातील संघर्ष ही अशीच एक चिंतेची बाब ठरली आहे. हा मुद्दा देवळी पुलगावचे आमदार राजेश बकाने यांनी उपस्थित केला आहे. त्यांनी त्यांच्या मतदारसंघात ही बाब किती गंभीर ठरत आहे हे मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून त्याचे उत्तर देतांना मध्यप्रदेशचा दाखला दिला.समस्या अशी की वन्यप्राण्यांचा हैदोस कमालीचा वाढत चालला आहे. त्यामुळे शेतकरी बंधू त्रस्त झाले आहेत.

नीलगाय, सांबर, हरीण, रानडुक्कर अश्या प्राण्यांनी शेतात घुसून पिक उध्वस्त करणे सूरू केले आहे. दिवस रात्र शेतात त्यासाठी पहारा देणे शक्य नाही. जीव धोक्यात घालून रात्रीस शेतात ठिय्या देणे सामान्य शेतकऱ्यांच्या आवाक्यापलीकडे आहे. म्हणून शासनाने शेतकऱ्यांना दिलासा द्यावा. आधुनिक तंत्रज्ञानाच्या आधारे तोडगा काढावा, अशी विनंती आमदार बकाने यांनी मुख्यमंत्री



फडणवीस यांना केली. प्राण्यांना अटकाव केल्यास पिकं वाचतील व शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसणार नाही, असे नमूद करण्यात आले.

तसेच हे करण्यासाठी त्यांनी बोमा तंत्रज्ञान उपयुक्त असल्याचे नमूद केले. मध्यप्रदेशात त्याचा उपयोग करीत शेतकऱ्यांना दिलासा दिल्या जात आहे. दक्षिण आफ्रिकेतील तंत्रज्ञ यात उपयुक्त ठरतात. त्यांच्या संस्थेच्या सहकार्याने हेलिकॅप्टरची मदत घेत उपाय होतो. हेलिकॉप्टरच्या माध्यमातून थेट फायबर नेट सोडल्या जाते. त्यात जनावरे अडकतात. प्राण्यास बेशुद्ध नं करता पकडून त्यांचे जंगलात स्थलांतर केल्या जाते. मध्यप्रदेशातील एकट्या शाजापूर जिल्ह्यात केवळ ११ दिवसात ९१३ नीलगायी व हरिणांचे स्थलांतर करण्यात आले. त्यामुळे शेतकऱ्यांचे पीक नुकसान थांबले. तसेच मानव - वन्यजीव संघर्षात लक्षणीय घट झाली. हाच प्रयोग करीत शेतकऱ्यांना दिलासा मिळाला पाहिजे अशी भावना आमदार बकाने यांनी व्यक्त केली.


ती समजून घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यावर उत्तर देतांना नमूद केले की मानव - वन्यजीव संघर्ष ही गंभीर बाब आहे. त्यावर शास्त्रीय दीर्घकालीन उपाय आवश्यक ठरतात. संबंधित विभागाकडून या प्रस्तावाचा सखोल अभ्यास केल्या जाईल. त्यानंतर योग्य तो निर्णय घेऊ. अशी भूमिका मुख्यमंत्र्यांनी घेतली व सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे आ. बकाने म्हणाले. शेतकरी समस्या राज्याच्या सर्वोच्च ठिकाणी पोहचली असून त्यावर तोडगा निघेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

## यंदाच्या हिवाळी अधिवेशनात चर्चा केवळ बिबट आणि कुत्र्यांची

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६नागपूर**

राज्याच्या हिवाळी अधिवेशनात विदर्भातील शेतकरी, बेरोजगारी अशा अनेक मुद्यांवर चर्चा होणे अपेक्षित असताना हे अधिवेशन बिबट आणि कुत्र्यांनी गाजले.

दरम्यान, पूर्व नागपुरात दोनदा बिबट आढळल्याने अधिवेशनाचा एकही दिवस बिबट्यांवरील चर्चेशिवाय गेला नाही. विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहात आणि सभागृहाबाहेर सातही दिवस बिबटच गाजला. राज्यात गेल्या काही महिन्यांपासून बिबट्यांच्या हल्लयात सातत्याने माणसांचे बळी जात आहेत. यात लहान मुलांची संख्या अधिक आहे. नागपुरातील हिवाळी अधिवेशनात हा विषय उपस्थित होणे क्रमप्राप्त होते. मात्र, हा विषय गांभीर्याने चर्चेला येण्यापेक्षा त्यातील गांभीर्य



हरवल्याचे दिसून आले. उपराजधानीत हिवाळी अधिवेशन घेण्यामागे विदर्भातील प्रश्न मार्गी लावणे हा एक उद्देश आहे. मात्र, हे गांभीर्य आजतागायत दिसून आले नाही.

अवघ्या सात दिवसाच्या अधिवेशनात विदर्भातील शेतकरी, बेरोजगारी या समस्यांवर एकाही सदस्याने भर दिला नाही. बिबट आणि कुत्र्यांवर मात्र दररोज चर्चा होत असली तरीही त्यात गांभीर्य नव्हते. यादरम्यान, उपराजधानीत दोनवेळा भरवस्तीत बिबट शिरला. एका घटनेत तब्बल सात लोकांना बिबट्याने जखमी केले. यादरम्यान, वनमंत्र्यांकडून ठोस उपाययोजना अपेक्षीत असताना त्यांनी विरोधकांसह सत्ताधाऱ्यांनाही हसण्याची संधी दिली. बिबट्यांसाठी एक कोटी रुपयांच्या शेळया जंगलात सोडण्याचे हास्यास्पद वक्तव्य त्यांनी केले. त्यांच्या या वक्तव्याचा त्यांच्याच सरकारमधील एका ज्येष्ठ नेत्याने खरपूस समाचार घेतला. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी एक कोटी रुपयांच्या शेळ्या जंगलात सोडण्याचे वक्तव्य हास्यास्पद असल्याचे एका अनौपचारिक चर्चेत सांगितले. तर दोन दिवसांनी रवी राणा यांनी बिबट्यांना पाळीव प्राण्यांचा दर्जा द्या, अशी मागणी केली.

यादरम्यान विधानभवन परिसरातील भटक्या कुत्र्यांचा गंभीर मुद्दाही समोर आला. अधिवेशन काळात विधानभवन परिसरातील मोकाट कुत्रे अधिकारी, कर्मचारी आणि आमदारांना त्रासदायक ठरतायत. त्यामुळे भटक्या कुत्र्यांचे निर्बिजीकरण आणि त्यांची निवारा केंद्र यावरून सर्वपक्षीय आमदार आक्रमक झाले होते. केवळ सत्ताधाऱ्यांनी नाही तर विरोधकांनीही भटक्या कुत्र्यांवरून आक्रमक भूमिका घेतली. आमदाराला कुत्रा चावला तर कोण जबाबदार ? असा सवाल शिवसेना (उबाठा)चे आमदार सुनील प्रभूंनी विचारला. तर सगळे भटके कुत्रे पर्यावरण प्रेमींच्या घरात सोडावेत अशी मागणी आमदार महेश लांडेगेंनी केली.

## नगरपरिषदेच्या निवडणुकीसाठी शाळांना दोन दिवस सुट्टी जाहीर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ अमरावती**

नगरपरिषद, नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक-२०२५ करिता दि. २० डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. त्यामुळे मतदान केंद्र असणाऱ्या नगरपरिषद, नगरपंचायत क्षेत्रातील




शाळा आणि महाविद्यालयांना दि. १९ आणि २० डिसेंबर रोजी दोन दिवसांची सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. जिल्ह्यातील अंजनगाव सुर्जी, अचलपूर, वरुड, दर्यापूर, आणि धारणी येथील नगरपरिषद, नगरपंचायत निवडणुकीसाठी मतदान केंद्रावर नियुक्त केलेले मतदान अधिकारी, कर्मचारी मतदान साहित्य घेऊन केंद्राचा ताबा घेणार असल्याने दोन दिवसांची सुट्टी असणार आहे, असे आदेश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी जारी केले आहे.

## सदनिका घोटाळाप्रकरणी क्रीडामंत्री माणिकराव कोकाटेंना २ वर्षांची शिक्षा, जिल्हा कोर्टाचा निकाल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६नाशिक**

राज्याचे क्रीडामंत्री आरोपी माणिकराव कोकाटे यांना दोन वर्षांची सक्तमजुरी व दहा हजारांचा दंडाची शिक्षा नाशिक जिल्हा व सत्र न्यायालयाने मंगळवारी (दि. १६) सुनावली. शिक्षेची अंमलबजावणी तातडीने करण्याचे आदेश जिल्हा व सत्र न्यायाधीश पी.एम.बदर यांनी अतिरक्त मुख्य न्यायदंडाधिकारी रुपाली नरवाडीया यांना दिले आहेत.

यामुळे त्यांच्या



न्यायालयाकडून आरोपी माणिकराव कोकाटे व त्यांचे बंधू विजय कोकाटे यांना कधीही अटकेचे समन्स बजावले जाऊ शकते. सदनिका घोटाळा कोकाटे बंधूंना अखेर भोवला. यापूर्वी नरवाडिया यांच्या कोर्टाने दिलेला निकाल सत्र न्यायालयानेही कायम ठेवला आहे.मुख्यमंत्री स्वेच्छाधिकार योजनेच्या दहा टक्के राखीव कोट्यातून नाशिक शहरातील कॅनडा कॉर्नरसारख्या मोक्याच्या ठिकाणी एका अपार्टमेंटमध्ये बनावट कागदपत्रांच्याअधारे फसवणूक करून चार सदनिका हडपल्याच्या आरोपाखाली कोकाटे बंधूंविरूद्ध खटला सुरू होता.

## शरद पवारांसोबत युती केल्यास काहीच हरकत नाही - अमित शाह

### राज्यात जिथे युती करणे शक्य असेल तिथे युती करा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६नवी दिल्ली**

राज्यातील महानगरपालिकांच्या निवडणुकीचं बिगुल वाजलंय. त्यामुळे सर्वच राजकीय पक्ष ॲक्शन मोडवर आले आहेत. अशातच आज राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल पटेल आणि महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. अमित शाह आणि प्रफुल पटेल आणि सुनील तटकरे यांच्यात जवळपास १५ मिनिटे चर्चा झाली. या बैठकीतील माहिती आता समोर आली आहे.

राज्यात जिथे युती करणे शक्य असेल तिथे युती करा, अशी अमित




शाह यांनी प्रफुल पटेल आणि सुनील तटकरे यांना सूचना दिल्या आहेत. तसेच शरद पवारांच्या राष्ट्रवादीसोबत अजित पवारांच्या राष्ट्रवादीने गेल्यास अमित शाह यांना काहीच हरकत नसल्याची सूत्रांची माहिती आहे. लवकरच महाराष्ट्रातील भाजपा नेतृत्वासोबत बोलण्याचं देखील आश्वासन देखील अमित शाह यांनी यावेळी प्रफुल पटेल आणि सुनील तटकरेंना दिलं. अमित शाहांच्या या भेटीनंतर उद्याच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांसोबत राष्ट्रवादीच्या नेत्यांची बैठक पार पडणार असल्याची सूत्रांची माहिती आहे.

## संपादकीय ......

# अधिवेशनाचा अर्थ!

विधिमंडळाच्या नागपूरमधील हिवाळी अधिवेशनाचे सूप वाजले. अधिवेशन केवळ आठवडाभर चालले. पंचाहत्तर कोटींच्या पुरवणी मागण्यांना मंजुरी आणि विकास प्रकल्पांचे महत्त्वाचे काही निर्णय वगळता अनेक महत्त्वाचे प्रश्न अनुत्तरित राहिले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांची छाया आणि त्यावरून झडलेला राजकीय वाद-संवाद प्रकर्षाने समोर आला. महाराष्ट्र पुन्हा एकदा निवडणुकांना सामोरा जात आहे. राज्याच्या इतिहासात यंदा प्रथमच विधिमंडळ अधिवेशनात दोन्ही सभागृहांचे विरोधी पक्षनेतेपद रिक्त होते. विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांचे सदस्यत्व संपल्यामुळे ते पद रिक्त आहे. तर, विधानसभेत शिवसेना ठाकरे पक्षाने भास्कर जाधव यांचे नाव विरोधी पक्षनेतेपदासाठी सुचवूनही त्यास मान्यता मिळाली नाही.

दोन्ही सभागृहांतील विरोधी पक्षनेतेपदाचा निर्णय घेण्याचा अधिकार सभाध्यक्षांचा असतो, असे सांगून राज्य सरकारने हात वर केले. तथापि, विरोधी पक्षनेता आवश्यक असतो आणि कमी सदस्यसंख्या असूनही यापूर्वी विरोधी पक्षनेतेपद बहाल करण्यात आल्याची उदाहरणे आहेत. यावेळी विधिमंडळ अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी उपमुख्यमंत्री व वित्तमंत्री अजित पवार यांनी तब्बल ७५ हजार २८६ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर केल्या. पुरवणी मागण्यांचा हा दुसरा विक्रमी आकडा होता. जून २०२४ मध्ये ९४ हजार ८८९ कोटींच्या पुरवणी मागण्या मंजूर करण्यात आल्या होत्या. मूळ अर्थसंकल्पाव्यतिरिक्त इतक्या प्रचंड रकमेच्या पुरवणी मागण्या सादर करणे, हे सरकारच्या वित्तीय बेशिस्तीचे लक्षण आहे, अशी टीका काँग्रेसचे विधानसभेतील नेते विजय वडेट्टीवार यांनी केली.

राज्य आर्थिक अडचणीत असताना, अतिमहत्त्वाच्या व्यक्तींच्या हवाई प्रवासासाठी १४३ कोटींची तरतूद करण्यात आली, याकडेही विरोधकांनी लक्ष वेधले. या अधिवेशनात बिबटे आणि वाघांच्या हल्लयांना 'राज्याची आपत्ती' म्हणून घोषित करण्यात आले. त्याचबरोबर वन्यजीवांच्या हल्लयांत मृत्यू झालेल्या व्यक्तीच्या कुटुंबातील एका सदस्याला शासकीय नोकरीत सामील करून घेणार असल्याची माहिती राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी दिली. सरकारने हा दिलासा दिला असला, तरी बिबट्यांविरोधात प्रभावी कारवाई करण्यात वन खाते साफ अपयशी ठरले असल्याचे नागपूर, नाशिक, पुणे, सातार्यातील घटनांवरून स्पष्ट होते.

अधिवेशन काळातच एका सत्ताधारी आमदाराच्या पुढ्यात नोटांच्या बंडलांची रास असलेला व्हिडीओ अंबादास दानवे यांनी समोर आणल्यामुळे राजकीय वातावरण तापले. हा व्हिडीओ म्हणजे एआयचा प्रताप असल्याचा खुलासा संबंधित आमदाराने केला. बुलडाणा आणि रत्नागिरी विभागातील जलसंधारण खात्याच्या दोन प्रकल्पांमधील अनियमिततेचा मुद्दा आमदार अनिल परब यांनी मांडला. त्यावरून विधान परिषदेत गोंधळ झाल्यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना याप्रकरणी एसआयटी नेमण्याची घोषणा करावी लागली. शासकीय निधीवाटपात असमतोल असून, विदर्भातील जनतेचा विश्वासघात करू नका, अशी टीका भाजपचे ज्येष्ठ नेते सुधीर मुनगंटीवार यांनी केली. राज्यात गुटख्याच्या माध्यमातून ड्रग्जची मोठ्या प्रमाणात विक्री सुरू असून, या प्रकरणात गुन्हेगारांना 'मोका' लावण्याचा महत्त्वाचा निर्णयही घोषित करण्यात आला.

मात्र, कायदे कितीही कडक केले, तरी अंमलबजावणी महत्त्वाची असते. महानगरपालिकांच्या निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून, सिडको घरांच्या किमतीत दहा टक्के कपात, मुंबई झोपडपट्टीमुक्त करण्यासाठी १७ ठिकाणी एसआरए समूह पुनर्विकास प्रकल्प, पागडी सिस्टीम रद्द करणे, अशा अनेक घोषणा उपमुख्यमंत्री शिंदे यांनी केल्या. मुंबईत 'उबाठा' शिवसेनेला आव्हान देण्यासाठी ते प्रयत्नशील आहेत. अधिवेशन सुरू असतानाच, अजित पवार यांचे पुत्र पार्थ यांना वाचवण्याचा प्रयत्न सुरू आहे का, असा सवाल उच्च न्यायालयाने केला होता. मात्र, या मुद्द्यावरून सरकारला अडचणीत आणण्याचा विशेष प्रयत्न विरोधकांकडून झालाच नाही. राज्यातील नागरी वस्त्यांमध्ये गुंठेवारी किंवा लहान भूखंडांवर राहणार्या तीन कोटी नागरिकांना दिलासा देणारे, तुकडेबंदी कायद्यातील जाचक अटी शिथिल करणारे महत्त्वाचे विधेयक मंजूर झाले, ही चांगली बाब म्हणावी लागेल.

कल्याण-लातूर या नवीन जनकल्याण द्रुतगती मार्गाची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. यामुळे मुंबई-हैदराबाद अंतर कमी होणार असून, मुंबई-लातूर अंतर केवळ साडेचार तासांत पार करता येणार आहे. नागपूर-गोवा शक्तिपीठ महामार्गाचे आरेखन बदलणार असल्याची घोषणाही मुख्यमंत्र्यांनी केली. अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देताना, त्यांनी राज्याच्या भविष्यकालीन विकासाबाबत दिशादिग्दर्शन केले. विरोधकांच्या बहुतेक शंका व आरोपांना उत्तरे दिली. मात्र, अनेकदा लक्षवेधी सूचना पुकारल्यावर संबधित खात्याचे मंत्री सभागृहात अनुपस्थित होते अथवा त्यांचे निवेदन सदस्यांना वितरित केले गेले नव्हते, असे प्रसंग घडले.

राज्याच्या विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन नेहमीप्रमाणेच जनतेच्या अपेक्षा, राजकीय आरोप-प्रत्यारोप आणि काही महत्त्वाचे निर्णय यांचे मिश्रण ठरले. शेतकरी, बेरोजगार युवक, पायाभूत सुविधा आणि कायदा-सुव्यवस्था या मुद्द्यांवर राज्यासमोर गंभीर आव्हाने असताना हे अधिवेशन अधिक परिणामकारक ठरेल, अशी अपेक्षा होती. मात्र, प्रत्यक्षात कामकाजाकडे पाहता समाधान आणि असमाधान दोन्ही भावना व्यक्त केल्या गेल्या. सरकारने काही धोरणात्मक निर्णय घेऊन विकासाचा अजेंडा पुढे नेण्याचा प्रयत्न केला. उद्योग, गुंतवणूक आणि पायाभूत प्रकल्पांबाबत सकारात्मक संदेश देण्यात आला. काही कल्याणकारी योजनांबाबत घोषणाही झाल्या. आता या निर्णयांची अंमलबजावणी लवकर आणि प्रभावी झाली तरच त्याचा थेट लाभ सामान्य माणसाला मिळेल. अंमलबजावणीचा कालबद्ध, पारदर्शक कार्यक्रम असायला हवा.केवळ कागदावरच्या योजना आणि आकडेवारी पुरेशी नाही, हे लक्षात घ्यायला हवे. विरोधकांनी सरकारला जाब विचारण्याची भूमिका घेतली, ही लोकशाहीसाठी आवश्यक बाब आहे. तथापि, वारंवार गदारोळ, कामकाज स्थगिती आणि वैयक्तिक आरोप, यामुळे अनेक महत्त्वाचे प्रश्न सविस्तर चर्चेअभावी बाजूला पडले. अधिवेशनातून राज्याला दीर्घकालीन दिशा मिळायला हवी. राज्यासमोरील प्रश्नांवर चर्चेतून मार्ग निघायला हवा. या अधिवेशनातून ही दिशा मिळाली का, यासह अनेक प्रश्न अनुत्तरित राहिले. २३ फेब्-ुवारीपासून सुरू होणार्या आगामी अर्थसंकल्पीय अधिवेशनात समतोल विकासाचा निश्चित आराखडा तयार व्हावा, अशी अपेक्षा.

## भाजपासोबत युती तुटताच

# दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याच्या हालचालींना वेग; बैठका सुरू



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६मुंबई**

आगामी महापालिका निवडणुकीत भाजपा आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीने वेगळे लढण्याचा निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही लढत मैत्रीपूर्ण होईल असं घोषित केले परंतु पुणे, पिंपरी चिंचवड महापालिकेत राष्ट्रवादीची सत्ता आणण्यासाठी मी माझं सर्वस्व पणाला लावेन असं सांगत अजित पवारांनीभाजपाला आव्हान दिले. आता पिंपरी चिंचवड महापालिकेत दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याच्या हालचालींना वेग आला आहे. निवडणुकीत मतविभाजन टाळण्यासाठी आणि भाजपाला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी दोन्ही राष्ट्रवादीनं एकत्र लढावे असा सूर स्थानिक पातळीवर सुरू झाला आहे.

याबाबत अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे निवडणूक प्रमुख नाना काटे म्हणाले की, काही दिवसांपूर्वी अजित पवारांनी आम्हाला स्थानिक पातळीवर शरद पवार गटाच्या लोकांसोबत चर्चा करून घ्या अशी सूचना केली होती. येणाऱ्या काळात आपल्या चिन्हावर कदाचित ते लढतील अशी साधक-बाधक चर्चा झाली.

त्यानंतर माझ्या मुलीच्या लग्नावेळी सुप्रिया सुळेंचा मला कॉल होता. त्यावेळी निवडणुकीवर चर्चा झाली तेव्हा ताईंनीही आपल्या मतांची विभागणी होता कामा नये त्यामुळे स्थानिक पातळीवर तुम्ही बोलून घ्या असं म्हटलं होते. त्याप्रकारे आम्ही स्थानिक पातळीवर चर्चा करून वरिष्ठांना कळवू असं त्यांनी म्हटलं.

तर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचा एक नंबरचा शत्रू कोण असेल तर तो भारतीय जनता पार्टी आहे. भाजपाला थोपवायचे असेल तर स्थानिक पातळीवर आघाडी करण्याचे निर्देश आम्हाला दिले होते. अलीकडे आमच्या कोअर कमिटीची बैठक झाली. त्यात जर दोन राष्ट्रवादी वेगळ्या लढल्या तर मत विभाजन होईल आणि त्याचा फायदा भारतीय जनता पार्टीला होईल असा सूर होता. त्यामुळे दोन्ही बाजूच्या कार्यकर्त्यांनी भावना मत विभाजन टाळण्यासाठी दोन्ही राष्ट्रवादीने एकत्रित लढले पाहिजे अशी आहे. त्या अनुषंगाने आम्ही स्थानिक पातळीवर दोन्ही गटाच्या नेत्यांची प्राथमिक चर्चा सुरू झाली आहे. येत्या २-३ दिवसांत चित्र स्पष्ट होईल असं शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे कोअर कमिटी सदस्य सुनील गव्हाणे यांनी माहिती दिली. सोबतच घड्याळ चिन्हावरच निवडणूक लढवण्याचा अद्याप अधिकृत प्रस्ताव नाही. वरिष्ठ पातळीवरून जे आदेश येतील त्याचे पालन केले जाईल असंही सुनील गव्हाणे यांनी म्हटलं आहे.

### राष्ट्रवादीच्या सोबतीला शिंदेसेनाही येणार?

दरम्यान, शिंदेसेनेचे खासदार श्रीरंग बारणे यांच्यासोबतही आमची चर्चा झाली आहे. त्यांनीही सकारात्मक भूमिका घेतली आहे. त्यामुळे दोन्ही राष्ट्रवादी आणि शिंदेसेना एकत्रित आघाडी करून निवडणूक लढवतील अशी शक्यता असल्याचे नाना काटे यांनी वर्तवले. तर मत विभाजन टाळण्यासाठी स्थानिक पातळीवर चर्चा होतील. आघाडीत लढताना फायदे तोटे होत असतात. त्यामुळे चर्चा करूनच पुढचा निर्णय होईल अशी सावध भूमिका शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे सुनील गव्हाणे यांनी घेतली आहे.




# रानभाज्या खा... आरोग्य चांगले ठेवा

**दि.१६विदर्भ प्रजासत्ताक**

कृषी विभाग आणि स्वयंसेवी संस्थांच्या वतीने अनेक ठिकाणी रानभाजी महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. खते व कीटकनाशकांमुळे अलीकडे आरोग्याच्या अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर रानभाज्या महोत्सवाच्या माध्यमातून मिळणार्या भाज्या आहारात घेतल्यास प्रकृतीला त्या फायदेशीर असल्याचे म्हटले जाते. मानवी आरोग्याला सकस आहार आवश्यक असतो, अशा प्रकारचा आहार रानभाज्यांमधून मिळतो.



**आयोजनामागील हेतू**

नागरी विभागातील लोकांना आदिवासी संस्कृतीची ओळख होण्यास मदत.

फळभाज्या, कंद, शेंगा या पारंपरिक भाज्यांत असतात औषधी गुणधर्म.

महिला बचत गट, आदिवासी भागात काम करणार्या संस्थांना आर्थिक लाभ.

डोंगराळ भागातील आदिवासींना औषधी वनस्पतींची असते माहिती.

प्रत्येक भाज्यांमध्ये लोह, तंतुमय पदार्थ, इतर खनिजे विपूल प्रमाणात असतात.

महाराष्ट्रात ८४ वेगवेगळ्या कुळांतील ३१४ प्रजाती रानभाजी म्हणून ओळखल्या जातात.

१९ टक्के वनस्पती पालेभाजी स्वरूपात तर उर्वरित फुले, फळ, कंद, खोड प्रकारात मोडतात.

रानभाज्यांचा वापर धार्मिक कार्यातही केला जातो. काही भाज्या साठवणुकीच्या स्वरूपातही वापरल्या जातात.

रानभाज्या प्रामुख्याने पावसाळ्यानंतर मिळतात. यंदा पावसाळा लांबल्याने रानभाज्या महोत्सवांचे आयोजन नोव्हेंबर, डिसेंबर महिन्यांत करण्यात आले आहे.

# ऊस तुटून गेल्यावर पाचट जाळण्यापेक्षा त्यावर 'ही' प्रक्रिया करून बघा; होतील असंख्य फायदे

**दि.१६विदर्भ प्रजासत्ताक**

साखर कारखान्यांचा गळीत हंगाम २०२५-२६ सुरु झाला असून ऊस उत्पादक शेतकरी तोडणी झाल्यानंतर आपल्या शेतातील पाचट जाळतात.

पाचट जाळणे योग्य की अयोग्य ते पाहूया. ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी आपल्या शेतातील ऊस गेल्यानंतर उसाचे पाचट जाळल्याने उलट नुकसान होईल.

शेतातील पाचट ठेवल्याने जमिनीच्या सुपीक जमिनीचे भौतिक, रसायनिक आणि जैविक गुणधर्म सुधारतील, ऊस उत्पादनात वाढ होईल, याचा विचार ऊस उत्पादक




शेतकऱ्यांनी करणे काळाची गरज आहे.

साधारणपणे एकरी जेवढे टन ऊस निघतो त्याच्या १०% पाचट निघते. पाचट कुजवण्यासाठी एकरी दोन गोणी युरिया, दोन गोणी सिंगल सुपर




फॉस्टेट, कम्पोस्टिंग कल्चर ५ ते १० किलो किंवा द्रवरूप स्वरूपात असेल तर एकरी १ लिटर वापरावे.तसेच साखर कारखान्यात उत्पादन होणारी मळी (प्रेसमड) ५ ते ७ टनांपर्यंत पाचटावर टाकावे. पूर्वी पाचट कुट्टी मशीन उपलब्ध नव्हती; परंतु आता आपल्या कार्यक्षेत्रात मोठ्या प्रमाणात मशीन उपलब्ध आहेत.

त्यामुळे या सर्व गोष्टींचा विचार करून आपण नियोजन केले तरच पुढील ऊस लागवडीसाठी आपल्या जमिनीची सुपीकता वाढेल, जर तुम्ही पाचट जाळाल तर पुढचे पीक घेणे अवघड होईल, याचे घातक परिणाम सर्वांनाच भोगावे लागतील.

**उसाच्या पाचटाचे फायदे**

१) जमिनीत कुजवल्यास जमिनीतील सेंद्रिय कर्बाचे प्रमाण वाढेल.

२) सोबतच पिकाला लागणाऱ्या अन्नद्रव्यांचा व्यवस्थित वापर होईल.

३) पाचटामध्ये नत्राचे प्रमाण ०.४५ ते ०.५०% स्फुरदचे ०.१२ ते ०.१५% व पालाश ०.५२ ते ०.६२% असते.

४) त्यामुळे शेतकऱ्यांच्या खर्चात बचत होईल.

५) त्याचबरोबर मातीच्या वरच्या थरातील अतिआवश्यक जिवाणू जिवंत राहतील.

६) सेंद्रिय कर्बाचा ऱ्हास होणार नाही.

७) गांडुळासारखे मित्रजीव नष्ट होणार नाहीत.

८) पाचटातील अन्नद्रव्ये जळून खाक होणार नाहीत.

# प्रहार व काँग्रेस कार्यकर्त्याचा भाजपात प्रवेश

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१६वलगाव-** भारतीय जनता पार्टी जिल्हाध्यक्ष श्री रविराज देशमुख यांच्या हस्ते शेकडो काँग्रेस व प्रहार जनशक्ती पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी वलगाव येथे प्रवेश घेतला. यावेळी जिल्हा सरचिटणीस शंतनू देशमुख, जिल्हा सरचिटणीस डॉ.सुमित पवार, जिल्हा उपाध्यक्ष अमित बाभुळकर, जिल्हा उपाध्यक्ष अजिंक्य वानखडे, तालुका सरचिटणीस मनोज खवड, मामासाहेब निर्मळ, मावे काका, सागर काळे, अनिल सिकची, पंकज बारबदे, धीरज डेहनकर, सुधीर रवाळे, संजय भुयार, विजय जोशी, संजय नेवरे, लिलाबाई तसरे, सरस्वती तलवारे, सविता हनवते, मंदाबाई भोरे, अन्नपूर्णा गायकवाड, इंदुबाई गायकवाड, सीमा तलवारे, वैशाली जोशी, मेघा गायकवाड, शीला गायकवाड उपस्थित होते.


याप्रसंगी जिल्हाध्यक्ष रविराज देशमुख यांच्याहस्ते त्यांचे भारतीय जनता पक्षामध्ये स्वागत करण्यात आले व पुढील वाटचालीस त्यांना शुभेच्छा दिल्या . याप्रसंगी वलगाव येथील भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी कार्यकर्ते व सहकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# सातबारा काढण्यासाठी आता तलाठ्याकडे जायची गरज नाही; डाउनलोड करा तुमच्या मोबाईलवर

**दि.१६विदर्भ प्रजासत्ताक**

राज्यातील सर्व शेत जमिनींच्या डिजिटल सातबारा, आठ-अ तसेच फेरफार नोंदींना महसूल विभागाने कायदेशीर मान्यता दिली आहे. यामुळे डिजिटल सातबारा, तलाठ्याच्या सहीविना अधिकृत मानल्या जातील. ७/१२, ८-अ आणि फेरफार उतारे हे सर्व सरकारी, निमशासकीय तसेच बँकिंग, कर्जप्रक्रिया आणि न्यायालयीन कामकाजासाठी पूर्णपणे कायदेशीर आणि वैध ठरतील. महाभूमी पोर्टलवरून अवघ्या १५ रुपयांत सातबारा उतारा मिळणार आहे. सातबारा जमिनीची यात मालकी, क्षेत्रफळ, लागवड व हक्कातील बदल यांची माहिती असते. डिजिटल सातबारा हा मालकी हक्क दाखवतो, तर आठ-अ मध्ये एका व्यक्तीच्या सर्व जमिनींची एकत्रित माहिती असते. फेरफार उतारा म्हणजे ७/१२ उताऱ्यामध्ये होणाऱ्या बदलांची नोंद, जसे की खरेदी-विक्री आणि वारसा.राज्य शासनाच्या महसूल विभागाने डिजिटल सातबारा, आठ-अ आणि फेरफार उताऱ्यांना सर्व सरकारी, निमसरकारी, बँकिंग आणि न्यायालयीन कामकाजासाठी कायदेशीर आणि वैध म्हणून




स्वीकारण्याचा शासकीय निर्णय (जीआर) जारी केला आहे.

या उताऱ्यांवर डिजिटल स्वाक्षरी (क्यूआर कोड व १६ अंकी पडताळणी क्रमांक) असणार आहे, ज्यामुळे ते पूर्णपणे वैध ठरतील. महाभूमी या अधिकृत पोर्टलला भेट द्या. ७/१२, आठ-अ किंवा फेरफार उतारा निवडा. आवश्यक माहिती भरा आणि डिजिटल पेमेंट करा.

**तलाठ्यांकडे जायची गरज नाही**

घरबसल्या ारहरलहींळ.र्सी.ळप या महाभूमी पोर्टलवरून अवघ्या प्रत्येकी १५ रुपयांत ७/१२, आठ-अ आणि फेरफार उतारा मिळणार आहे. हे उतारे कायदेशीर असून, त्यांना पूर्णपणे सरकारी मान्यता मिळाली आहे. त्यामुळे सरकारी कामकाज, कर्जप्रक्रिया आणि इतर व्यवहारांसाठी तलाठ्यांच्या कार्यालयाला जाण्याची गरज नाही.

**कसा डाउनलोड कराल सातबारा उतारा?**

महाभूमी या अधिकृत पोर्टलला भेट द्या.

ओटीपी बेस्ड लॉगिन पर्याय निवडा.

तुमचा मोबाईल नंबर टाका.

सेंड ओटीपी म्हणा.

आलेला ओटीपी खाली टाका

आलेला ओटीपी खाली टाका आणि व्हेरिफाय म्हणा.

यानंतर तुम्हाला सातबारा व आठ यापैकी कोणते कागदपत्र काढायचे आहे त्यानुसार त्याची निवड करा.

नंतर तुमचा जिल्हा, तालुका, गाव निवडा.

गट नंबर किंवा सर्वे नंबर टाका. खालील रखाण्यामध्ये क्लिक करा क्लिक करा.

पिक पाहणीचा पर्याय निवडा.

डाउनलोड टॅब वरती क्लिक करून डाउनलोड करा.

(यासाठी तुम्हाला तुमचे खाते रिचार्ज करणे गरजेचे आहे. रिचार्ज अकाउंट या टॅबवर जाऊन तुम्ही तुमच्या अकाउंटला पैसे भरू शकता. पैसे भरूनच सातबारा डाउनलोड करता येईल.)

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाथा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

मंगळवार दि. १६ डिसेंबर २०२५

शहर/ग्रामिण

# चाकूने सपासप १५ वार करुन निघृण हत्या





पवन वानखेडे असे मृतकाचे नाव

### घटनास्थळी प्रचंड गोंधळ

पवन वानखेडे यांच्या हत्येनंतर, मृताचा मुलगा पवन यांच्या समर्थकांनी कथित हल्लेखोरांच्या घरांवर हल्ला आणि दगडफेक केली. त्यानंतर, दुकाने बंद करण्याची मागणी करत भाजी बाजार चौकात ते गोंधळ घातला. यावेळी मोठा जमाव जमला होता. तणावपूर्ण परिस्थितीला प्रत्युत्तर म्हणून जमाव पांगविण्यासाठी पोलिसांनी लाठीचा वापर केला.

## घटनेनंतर परीसरात तणावाचे वातावरण, हल्लेखोराच्या घरावर हल्ला, दगडफेक

## खोलापुरी गेट अंतर्गत भाजी बाजार परीसरातील घटना , पोलिस बंदोबस्त

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६अमरावती** खोलापुरी गेट पोलीस स्टेशन अंतर्गत भाजी बाजार परीसरात क्षुल्लक कारणावरून चाकूने सपासप १२ ते १५ घाव करून एकाची हत्या करण्यात आली. पवन पंजाबराव - वानखेडे (५०, खरकाडीपुरा) असे मृतकाचे नाव आहे. सोमवारला रात्री ७.३० ते ८ वाजताच्या सुमारास ही थरारक घटना घडली. या घटनेमुळे संपूर्ण खोलापुरी गेट भाजी बाजार परीसरात तणावाचे वातावरण निर्माणझाले होते. या हत्या प्रकरणातील आरोपी वैभव पात्रे, साहिल हिरपूरकर, सुशील ढोले आणि शुभम ढोले आहेत. चारही आरोपी फरार असल्याने पोलिस त्यांचा शोध घेत आहेत.

माहितीनुसार, खोलापुरी गेट पोलीस स्टेशन परिसरातील रहिवासी पवन पंजाबराव वानखेडे हा मालमत्ता आणि व्याजाचा व्यवहार करीत होता. मृतक आणि त्याच्या मुलावर अनेक गुन्हे दाखल होते. दरम्यान, जुन्या विवादातून आरोपी आणि मृताच्या कुटुंबात सतत भांडण सुरू होते. दरम्यान, हत्येबाबत असेही वृत्त आहे की आरोपी परिसरात गांजा ओढत होते. त्यामुळे पवन वानखेडे यांनी त्यांना फटकारले, त्यामुळे हा गुन्हा घडला. सोमवारी संध्याकाळी पवन भाजी बाजार चौकातील त्याच्या चाट भंडार जवळ बसला होता. आरोपी वैभव पात्रे, साहिल हिरपूरकर, सुशील ढोले आणि शुभम ढोले यांनी येऊन पवनच्या मानेवर, छातीवर आणिपोटावर सुमारे १२ ते १५ वेळा चाकूने सपासप वार केले आणि घटनास्थळावरून पळून गेले. यात गंभीर जखमी पवनचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच खोलपुरी गेट पोलिस घटनास्थळी पोहोचले. गंभीर जखमी पवन वानखेडे यांना तात्काळ पोलिसांच्या वाहनातून जिल्हा सामान्य रुग्णालयात नेण्यात आले, जिथे डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. हत्येनंतर मृत पवन वानखेडे यांच्या समर्थकांमध्ये तणाव वाढला. पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल केला आहे आणि चार फरार आरोपींचा जोरदार शोध सुरू केला आहे.

# यमुना एक्सप्रेस-वेवर धुक्यामुळे ७ बसेस-३ कारची धडक, ४ जण जिवंत जळाले

## १५० जखमी; एक्सप्रेस-वेवर धुक्यामुळे भीषण अपघात

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६मथुरा -** मथुरेत मंगळवारी पहाटे ४ वाजता यमुना एक्सप्रेस-वेवर धुक्यामुळे ७ बसेस आणि ३ कार एकमेकांवर आदळल्या. टक्कर होताच गाड्यांना आग लागली. या अपघातात ४ जणांचा जळून मृत्यू झाला आहे. एका प्रत्यक्षदर्शीने सांगितले की, २० रुग्णवाहिकांमधून १५० लोकांना रुग्णालयात पाठवण्यात आले आहे. डीएम चंद्र प्रकाश सिंह यांच्या माहितीनुसार, हा अपघात बलदेव पोलीस स्टेशन हद्दीतील माइल स्टोन १२७ येथे झाला. डीएम आणि एसएसपी यांच्यासह अधिकारी घटनास्थळी पोहोचले आहेत. बचावकार्य सुरू आहे. पोलीस, अग्निशमन दल, छक्-ख आणि डऊक्र चे कर्मचारी आग विझविण्यात आणि जखमींना रुग्णालयात पोहोचवण्यात गुंतले आहेत.





प्रत्यक्षदर्शी भगवान दास यांनी सांगितले की, गाड्या एकमेकांवर आदळल्या तेव्हा गोळीबार झाल्यासारखा आवाज आला. मोठे स्फोट झाले. संपूर्ण गाव तातडीने येथे पोहोचले. सर्व लोकांनी तत्काळ मदत केली. रुग्णवाहिकेचे कर्मचारी अमित कुमार यांनी सांगितले की, किती लोक जखमी झाले आहेत, याची मोजणी सध्या करता येणार नाही.

आणखी एका प्रत्यक्षदर्शीने सांगितले की, अपघातानंतर आम्हाला आगीचा लोळ दिसला. लोक बसच्या खिडक्यांच्या काचा फोडून बाहेर उड्या मारत होते. सर्वत्र किंकाळ्यांचा आवाज होता. भास्करचे रिपोर्टर घटनास्थळी पोहोचले तेव्हा त्यांना जळून खाक झालेल्या बसमध्ये मानवी अवयव अडकलेले दिसले.एसएसपी श्लोक कुमार म्हणाले की, दाट धुक्यामुळे हा अपघात झाला. सात बस आणि तीन कार एकमेकांवर आदळल्या. बसेसना आग लागली. बचावकार्य अंतिम टप्प्यात आहे.

प्रत्यक्षदर्शी सुनील कुमार यादव म्हणाले, आम्ही जौनपूरमधील एका मंत्र्यांच्या घरातून परतत होतो. आम्ही दिल्लीला जात होतो. अंधार पडला होता. अचानक वाटेत एका गाडीचा आवाज आला. आम्ही घाईघाईने बाहेर पडलो. आम्ही गाडीचा गेट उघडताच बसेस एकामागून एक आम्हाला धडकू लागल्या. घटनास्थळी ओरड आणि आरडाओरडा सुरू होता. काही जण बसमधून उतरण्यासाठी धडपडत होते, तर काही जण काचेतून उड्या मारत होते.

# तीन दिवसांत १८५ कामांना मंजुरी; २८ कोटींच्या खर्चावर प्रश्नचिन्ह



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६अमरावती-** महानगर पालिका निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्याच्या अगदी तोंडावर जिल्हा नियोजन समितीअंतर्गत २८ कोटी रुपयांच्या तब्बल १८५ विकासकामांना मंजुरी देण्यात आल्याने शहराच्या राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. विशेष म्हणजे या सर्व कामांच्या वर्कऑर्डर अवघ्या तीन दिवसांपूर्वीच काढण्यात आल्या, तर निधीही तत्काळ आवंटित करण्यात आल्याची माहिती समोर आलेली आहे. आचारसंहिता १६ डिसेंबरनंतर केव्हाही महानगरपालिका निवडणुकीची लागू होण्याची शक्यता वर्तवण्यात येत होती, त्यानुषंगाने शासन-प्रशासन कामाला लागले होते. निवडणूक आयोगाने सोमवारी (ता.१५ डिसेंबर) आचारसंहिता लागू केली. त्यामुळे प्रशासनाची चांगलीच तारांबळ उडाली. आचारसंहिता लागू झाल्यामुळे शहरात आयोजित विविध शासकीय कार्यक्रमाच्या नियोजित कार्यक्रमापूर्वी त्या कार्यक्रमाचे आयोजन करावे लागले. तर दुसरीकडे आचारसंहिता लागणार म्हणून महापालिका प्रशासनाने तब्बल २८ कोटींच्या कामांच्या निविदा प्रक्रिया करून त्यांना मंजूरी दिली. या मंजूर कामांसाठी शासनाकडून ५० टक्के निधी म्हणजेच १४ कोटी रुपये थेट अमरावती महानगरपालिकेला प्राप्त झाले. संबंधित कामांचा करारनामा प्रक्रिया देखील पूर्ण करण्यात आलेली आहे. उर्वरित निधी पुढील टप्प्यात मिळणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात येत आहे. या १८५ कामांमध्ये पेव्हिंग ब्लॉक रस्ते, काँक्रीट रस्ते, रस्त्यांचे नूतनीकरण, नाल्यांची दुरुस्ती, ग्राउंडमधील सभागृहांची कामे तसेच शाळांशी संबंधित विकासकामांचा समावेश आहे. यातील जेवडनगर शाळा व सभागृहांशी संबंधित कामांसाठी सुमारे १ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आलेला आहे. २५ लाख रुपयांपेक्षा अधिक खर्चाच्या कामांसाठी स्टैंडिंग कमिटीची मंजुरी आवश्यक असते. त्यानुसार एकूण २२ कामांना स्टैंडिंग कमिटीची मंजुरी देण्यात आली आहे. या कामांपैकी काही कामे थेट मनपा फंडातून तर काही कामे विशेष निधीतून करण्यात येणार आहेत.

## प्रभाग क्रमांक ११ रुख्मिणीनगर-फ्रेजरपुरा मधून

# भाजपा करीता इंजि. कमल मालवीय यांची दावेदारी भक्कम

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६अमरावती-** अमरावती महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीच्या रणधुमाळीला वेग आला असून विविध प्रभागांतून इच्छुक उमेदवारांची नावे पुढे येत आहेत. त्यातच प्रभाग क्रमांक ११ रुख्मिणीनगर-फ्रेजरपुरा येथून इंजिनिअर कमल मालवीय यांची दावेदारी भाजपा करिता भक्कम मानली जात आहे. स्थानिक पातळीवर त्यांना मिळणारा वाढता पाठिंबा आणि जनसंपर्कामुळे ते या प्रभागातील मजबूत दावेदार ठरत असल्याचे चित्र आहे.



इंजि. कमल मालवीय हे मनमिळावू स्वभाव, सर्वसामान्य नागरिकांशी थेट संवाद आणि प्रत्येकाला सोबत घेऊन काम करण्याच्या भूमिकेसाठी ओळखले जातात. प्रभागातील नागरी समस्या, मूलभूत सुविधा, रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, तसेच युवक व महिलांच्या प्रश्नांबाबत त्यांनी सातत्याने सकारात्मक भूमिका घेतली आहे. त्यांच्या या कार्यशैलीमुळे विविध सामाजिक घटकांमध्ये त्यांची लोकप्रियता वाढत असून नागरिकांमध्ये विश्वासाचे नाते निर्माण झाले आहे.

स्थानिक नागरिकांच्या मते, विकासकामांबाबत स्पष्ट दृष्टिकोन, तांत्रिक ज्ञानाचा उपयोग करून समस्या सोडवण्याची क्षमता आणि प्रशासनाशी समन्वय साधण्याची हातोटी हे त्यांचे मोठे प्लस पॉईंट आहेत. त्यामुळे आगामी निवडणुकीत ते भाजप साठी प्रभावी उमेदवार ठरू शकतात, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

भाजपाने प्रभाग क्रमांक ११ मधून इंजि. कमल मालवीय यांना उमेदवारी दिल्यास, या प्रभागातून भाजपचे चारही उमेदवार विजयी होण्याची क्षमता त्यांच्या नेतृत्वात आहे, असे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे. सध्या सुरू असलेल्या राजकीय हालचालींमुळे प्रभाग क्रमांक ११ कडे सर्वांचे लक्ष लागले असून, येत्या काळात येथील लढत अधिक रंगतदार होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## राज्य निवडणूक आयोगाकडे समीर जवंजाळ यांची मनपाविरोधात तक्रार

# निविदा प्रक्रियेत गंभीर अनियमिततेचा आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६अमरावती -** अमरावती महानगरपालिकेतील निविदा प्रक्रियेत गंभीर व अनियमितता शासनाची आर्थिक फसवणूक करण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचा गंभीर आरोप करत समीर रमेशराव जवंजाळ यांनी महाराष्ट्र निवडणूक राज्य आयोगाकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. आगामी महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आदर्श आचारसंहितेचा संभाव्य भंग झाल्याची तक्रार युवक काँग्रेसचे समीर जवंजाळ यांनी केली आहे.

तक्रारीनुसार, अमरावती महानगरपालिकेने दिनांक ४ नोव्हेंबर २०२५ रोजी निविदा क्रमांक ३४ अंतर्गत सुमारे २३० विकासकामांची निविदा प्रक्रिया राबवली. मात्र, सदर निविदांची आवश्यक ती तांत्रिक व आर्थिक छाननी न करता तसेच शासनाच्या वित्तीय नियमांचे उल्लंघन करून पुढील कार्यवाही करण्यात आल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत असल्याचे त्यांनी तक्रारीत नमूद केले आहे. संबंधित कंत्राटदारासोबत अद्याप कोणताही करारनामा करण्यात आलेला नाही. तसेच सुरक्षा अमानत ठेव रक्कम स्वीकारण्यात आलेली नसून, निविदा प्रक्रियेची कोणतीही अधिकृत नस्ती अथवा फाईल तयार



करण्यात आलेली नाही. याशिवाय आयुक्त, अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त तसेच वित्त विभागातील संबंधित अधिकाऱ्यांची तांत्रिक व आर्थिक मंजुरी व सह्या घेतल्या नसल्याचा आरोपही तक्रारीत करण्यात आला आहे.

विशेष म्हणजे, नियमानुसार कार्यारंभ आदेश देणे आवश्यक असताना, दिनांक १० डिसेंबर २०२५ रोजी संबंधित कंत्राटदारांना केवळ 'हेतू पत्र' देण्यात आल्याचे जवंजाळ यांनी तक्रारीत नमूद केले आहे. ही संपूर्ण प्रक्रिया महानगरपालिकेतील संबंधित अभियंत्यांनी आपल्या पदाचा दुरुपयोग करून केल्याचा आरोप त्यांनी केला आहे. ही कार्यवाही महानगरपालिकेच्या आर्थिक हिताचे गंभीर नुकसान करणारी असून, शासन निर्णय व वित्तीय नियमांची सर्रास पायमल्ली करणारी आहे. तसेच निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही प्रक्रिया राबवण्यात आल्याने राज्य निवडणूक आयोगाच्या आदर्श आचारसंहितेचा भंग झाल्याचा ठपका जवंजाळ यांनी तक्रारीतून ठेवण्यात आला आहे.

दरम्यान, राज्य निवडणूक आयोगाकडे तातडीने चौकशी करून संबंधित ठेकेदारांना देण्यात आलेले हेतू पत्र तत्काळ रद्द करावे, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच सदर निविदा प्रक्रिया स्थगित अथवा रद्द करण्यात यावी, अशी मागणी समीर जवंजाळ यांनी केली आहे.

# आवक वाढल्याने बाजारात हिरव्या पालेभाज्या स्वस्त

## पालक, मेथी, कोथिंबिर, शेपू, चवळी, लाल माठ या भाज्या खाण्याची सध्या चंगळ

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६ अमरावती-** अमरावती शहरातील ठोक व चिल्लर बाजारात पालक, मेथी, कोथिंबिर, शेपू, चवळी, लाल माठ, चाकवत, पातीचा कांदा या पालेभाज्यांची आवक वाढल्यामुळे त्या आता स्वस्त झाल्या असून अगदी दर्जेदार मिळत असल्याने गृहिणीही सुखावल्या आहेत. कारण, दररोज विविध खाद्य पदार्थ तयार करण्यासाठी त्यांना स्वस्त पर्याय उपलब्ध झाले आहेत. पालक सध्या ४० रु., मेथी ६० रु., चवळी ६० रु., लाल माठ, ५० रु.,



कोथिंबिर, ४० रु., शेपू ६० रु., चाकवत ६० रु., पातीचा कांदा ४० रु. किलो दराने बाजारात मिळत आहे. जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात पालेभाज्यांचे उत्पादन होत असून त्यामुळे भाडी मंडीत दररोज मोठ्या प्रमाणात ताज्या पालेभाज्या येत असल्याने साहजिकच त्यांचे दर घसरले आहे.तरी मागणी मात्र वाढल्याची माहिती पालेभाज्यांचे ठोक विक्रेते अमीन अहमद यांनी दिली. सध्या पालक व मेथीसह चावकत या तिन्ही भाज्यांचे विविध पदार्थ बनवण्याकडे गृहिणींचा कल दिसून येत आहे.

# ६.१० लाखाचे ५२ ग्रॅम एमडी ड्रग्ज जप्त

## गुन्हे शाखेची रिंग रोडवर कारवाई, दोन आरोपी अटकेत

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६अमरावती-** शहरातील रिंग रोडवर मफेड्रोन एमडीची तस्करी करणाऱ्या दोन आरोपींना सोमवारी संध्याकाळी अटक करण्यात आली. स्थानिक गुन्हेच्या पोलिसांच्या पथकानेही कारवाई केली. या कारवाईत एकूण ६ लाख १० हजार रुपयांचे एमडी ड्रग ताब्यात घेण्यात आले. याप्रकरणी अटक केलेल्या आरोपींमध्ये शेख जमीर उर्फ बाबा



शेख आमद (३९ रा गवळीपुरा, रतनगंज) आणि एका अल्पवयीन मुलाला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. रिंगरोडवर संध्याकाळी रिंग कारवाई करताना आरोपीजवळून ५२ ग्रॅम एचडी ड्रग्ज जप्त करण्यात आले आहे. सोमवारी क्राईम ब्रांचचे पोलिस पेट्रोलिंग करत असताना, मिळालेल्या माहितीवरुन बाबा उर्फ जमीर आपल्या साथीदार आसीम खान सोबत अवैधरित्या एमडी विकण्याच्या उद्देशाने लालखडी रिंग रोडवर - एक्टिव्हा वाहन क्रमांक एम एच-३१ एफ एम ३७४० येतसल्याचे समजले. माहिती मिळताच, पोलिस निरिक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वात पथकाने जाळे पसरवून दोघांना ताब्यात घेतले. झडतीघेताना आरोपजवळून ५२ ग्रॅम एमडी, एक मोबाईल आणि एक अॅक्टिवासह एकूण ६ लाख १० हजार रुपयांमचा मुद्देमाल जप्त केला. चौकशीत आरोपीने संगितले की, हे ड्रग्ज शेख राजा, शेख सोनू, शेख फईम शेखर रहीम (सर्वरा गवळीपुरा) याचे आहे. पोलिस स्टेशन नागपुरी गेटमधे एनडीपीएस अॅक्ट नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**फरार आरोपीचा शोध सुरु**

याप्रकरणी क्राईम ब्रंचपोलिसांनी शेख जमीर उर्फ बाबा शेख आमद (३९ गवळीपुरा) आणि एक अल्पवयीनला ताब्यात घेतले आहे. याप्रकरणी आरोपी शेख राजा शेख रहीम उर्फ होंगा, शेख सोनू शेख रहीम उर्फ होंगा, शेख फईम शेख रहीम उर्फ डुंगा, शेख रहीम उर्फ ढुंगा शेख आमद फरार झाले आहेत.

**दोन आठवडयात १२७ ग्रॅम एमडी जप्त-** गुन्हे शाखेने नॅशनल हायवेवर आठवडयाच्या सुरुवाती ला ६९ ग्रॅम ड्रग्ज जप्त केले होते. यानंतर पोलिसांनी कांतानगर परिसरात २६ ग्रॅम ड्रग्ज जप्त केले. तर आता ५२ ग्रॅम एमडी ड्रग्ज पकडल्या गेले आहे. दोन आठवड्यात पोलिसांनी सुमारे १५ लाख ११७ रुपयांची एमडी ड्रग्ज पकडले आहे.

# अंतिम मतदारयादी प्रसिद्ध; घोळ कायम

## कपात अपेक्षित असताना मतदारसंख्या थेट १३ ने वाढली

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६अमरावती** अमरावती महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महापालिका प्रशासनाने सोमवारी अंतिम मतदारवादी प्रकाशित केली. मात्र या अंतिम मतदारयादीत अपेक्षित कपात न होता उलट १३ मतदारांची वाढ झाल्याचे समोर आले आहे. मतदार यादीतील घोळ अद्यापही कायम असल्याची शंका व्यक्त होत असून प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

अंतिम मतदारयादी प्रसिद्ध होण्यापूर्वी शहरातील ६०० हून अधिक मतदारांनी यादीतील त्रुटींविरोधात हरकती नोंदविल्या होत्या. मृत मतदारांची नावे, एकाच व्यक्तीची दुबार नावे, चुकीचे पत्ते तसेच प्रभाग बदलून नावे समाविष्ट केल्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणात करण्यात आल्या होत्या. मात्र या हरकतींचे योग्य निराकरण न करता मतदारयादी जवळपास जशीच्या तशीच अंतिम करण्यात आल्याचा आरोप नागरिक आणि राजकीय पक्षांकडून केला जात आहे.



महापालिका प्रशासनाने यापूर्वी प्रसिद्ध केलेल्या प्राथमिक मतदार यादीनुसार शहरात एकूण ६ लाख ७७हजार १६७ मतदार नोंदणीकृत होते. त्यामध्ये ३ लाख ३९ हजार १७७ पुरुष, ३ लाख ३७ हजार ९३५ महिला आणि ६८ इतर मतदारांचा समावेश होता. या यादीवर मोठ्या प्रमाणावर हरकती प्राप्त झाल्या होत्या.

युवक काँग्रेसच्या वतीने एका भाजप कार्यकर्त्याच्या घराच्या पत्त्यावर तब्बल २०० मतदार नोंदविले गेल्याची तक्रार निवडणूक विभागाकडे केली होती. याशिवाय एका महिलेचे नाव तब्बल ४० वेळा मतदारयादीत आढळून आल्याचा दावा करण्यात आला होता. अशा प्रकारच्या गंभीर त्रुटींमुळे बोगस मतदानाची शक्यता नाकारता येत नसल्याचे काँग्रेसकडून सांगण्यात आले.

तसेच अनेक मतदारांची नावे एका प्रभागातून सऱ्या प्रभागात समाविष्ट करण्यात आल्याचेही बदर्शनास आले होते.

मात्र अंतिम मतदारयादी जाहीर झाल्यानंतर मतदारसंख्या ६ लाख ७७ हजार १८० इतकी दर्शविण्यात आल्याने, आक्षेप व दुरुस्ती प्रक्रियेनंतर मतदारसंख्या कशी काय वाढली, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

दरम्यान, अंतिम मतदार यादी प्रसिद्ध झाल्यानंतर २७ डिसेंबर रोजी मतदान केंद्रनिहाय मतदारयादी जाहीर करण्यात येणार आहे. त्यामुळे मतदारांना आपले नाव कोणत्या मतदान केंद्रावर आहे, याची खात्री करता येणार आहे. सर्व मतदारांनी मतदान केंद्रावर आपले नावा तपासून घ्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे. दुसरीकडे, मतदानापूर्वीच मतदार यादीतील घोळ उघड होण्याची शक्यता असून, २७ डिसेंबर रोज प्रसिद्ध होणाऱ्या केंद्रनिहाय यादीत अनेक त्रुटी समो येतील, असा आरोप काँग्रेस ने केला आहे.

# निधी अभावी फुलसावंगीतील जलजीवन मिशनचे काम ठप्प

## "गावकऱ्यांची तेलही गेले अन् तूपही गेले" अशी अवस्था

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६फुलसावंगी–** ग्रामीण भागात प्रत्येक घरापर्यंत नळाद्वारे स्वच्छ पाणी पुरवठा करण्याच्या उद्देशाने सुरू झालेल्या जलजीवन मिशन (हर घर जल योजना) अंतर्गत फुलसावंगी गावातील काम गेल्या आठ महिन्यांपासून पूर्णपणे बंद पडले आहे. कंत्राटदारांच्या बिलांचे प्रलंबित थकबाकीमुळे हे काम ठप्प झाल्याची माहिती समोर येत आहे. योजनेच्या कामासाठी गावातील नव्याने बांधलेले सिमेंट रस्ते फोडण्यात आले असून, पाइपलाइन टाकण्यात आली आहे. मात्र, नळांपर्यंत पाणी पोहोचले नसल्याने रस्तेही खराब झाले आहेत. परिणामी, गावकऱ्यांची तेलही गेले अन् तूपही गेले' अशी दयनीय अवस्था झाली आहे. जलजीवन मिशन ही केंद्र सरकारची महत्वाकांक्षी योजना आहे.

या योजनेअंतर्गत फुलसावंगी गावासाठी सुमारे १२ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला होता. या योजनेमुळे गावातील पाणीटंचाईचा कायमस्वरूपी



नायनाट होईल, अशी अपेक्षा गावकऱ्यांनी व्यक्त केली होती. फेब्रुवारी २०२३ मध्ये पाण्याच्या टाकीच्या ठिकाणी योजनेचे भूमिपूजन करण्यात आले. मात्र, दोन वर्ष उलटूनही काम अर्धेही पूर्ण झालेले नाही. सुरुवातीला संथगतीने सुरू असलेले काम आता निधी अभावामुळे गेल्या आठ महिन्यांपासून बंद आहे. यामुळे काम कधी पूर्ण होईल, याबाबत गावकऱ्यांमध्ये शंका निर्माण झाली.


> मंत्री, आमदारांचे कामाकडे होतेय अक्षम्य दुर्लक्ष महागाव तालुका आढावा बैठकीत मंत्री इंद्रणिल नाईक यांच्या फुलसावंगीच्या जल जीवन मिशनच्या थांबलेल्या कामाबद्दल माहिती दिली. मात्र मंत्री महोदयांनी किंवा आमदार साहेबांनी कामाबद्दल पूर्णतः दुर्लक्ष केले आहेत. या अपुऱ्या कामामुळे गावातील सर्व पूर्णपणे रस्ते खराब झाले आहेत.
>
> **– कुणाल नाईक , उपसरपंच फुलसावंगी.**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर शतकोत्तीवर्षानिमित्त फुलसावंगी गावात सुमारे तीन कोटी रुपयांचा निधी खर्चून गावाच्या कानाकोपऱ्यात सिमेंटचे रस्ते बांधण्यात आले होते. मात्र, जलजीवन मिशनच्या पाइपलाइन टाकण्यासाठी हे रस्ते जेसीबीने फोडण्यात आले. परिणामी, गावातील अर्ध्याहून अधिक रस्ते पायदळ चालण्या लायकही राहिले नाहीत. घरोघरी नळ येण्याची अपेक्षा असताना ती स्वप्नच राहिली आहे. शिवाय, पूर्वीचे चांगले रस्तेही खराब झाल्याने गावकऱ्यांना दुहेरी फटका बसला आहे.ही योजना लवकरात लवकर पूर्ण होऊन गावातील पाणीटंचाई दूर होईल, अशी अपेक्षा व्यक्त करीत आहेत.

> डिसेंबर महिन्यात निधी येईल, त्यानंतर काम करू संपूर्ण महाराष्टरात कोट्यवधी रुपये देयके शिल्लक आहेत. एकट्या फुलसावंगीमध्ये जवळपास चार कोटी रुपये शिल्लक आहेत. सद्या निधी नाही, त्यामुळे डिसेंबर महिन्यात निधी मिळाल्यास सदरचे काम सुरू होईल.
>
> **– संतोष मुरकुटे , शासकीय कंत्राटदार.**

# सेवानिवृत्त अधीक्षकाची २१.६५ लाखांनी ऑनलाईन फसवणूक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६अमरावती** शेअर मार्केटमध्ये मोठ्या प्रमाणात नफा मिळत असल्याची बतावणी करून रेल्वे विभागातील सेवानिवृत्त अधीक्षकांची २१ लाख ६५ हजार रुपयांनी फसवणूक करण्यात आली. विवेक तुळशीराम बनसोड (वय ६१, रा. भीमज्योत कॉलनी, साईनगर), असे तक्रारकर्त्या



सेवानिवृत्त अधिक्षकाचे नाव आहे. विवेक बनसोड यांच्या मोबाईलवर काही दिवसांपूर्वी अनोळखी व्यक्तीने फोन केला. शेअर मार्केटमध्ये पैसे गुंतविले तर मोठ्या प्रमाणत नफा मिळतो. तसेच नामांकित कंपनीचा लोगो व माहिती चोरी करून त्यांना संबंधित कंपनीत पैसे गुंतविण्यास भाग पाडले. सांगितल्याप्रमाणे बनसोड यांनी दिलेल्या बँक खात्यात २१ लाख ६५ हजार रुपये जमा केले. परंतु जमा केलेली रक्कम परत मिळत नाही, असे लक्षात येताच त्यांनी सायबर ठाण्यात धाव घेतली. याघटनेत पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपासात घेतला.

# पोलीस दलात एमसीयू विभाग कार्यान्वित

## गुन्हेगारांची संग्रहित माहिती मिळणार एका क्लिकवर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६अमरावती** शहर पोलीस आयुक्तालयात नव्याने कार्यान्वित झालेल्या मेझरमेंट कलेक्शन युनिट (एमसीयू) विभागाची यापुढे आरोपी शोधण्यात मुख्य भूमिका राहणार आहे. एमसीयू विभागात प्रत्येक गुन्हेगारांचे ३० ते ६० डिग्रीमध्ये ६ प्रकारे फोटो, आय राईज, आधारकार्ड आणि ब्लड ग्रुप ही सर्व माहिती संग्रहित केली जात आहे. ही सर्व माहिती ऑनलाईन असून संबंधित विभागावर पुणे सीआयडी विभागाचे नियंत्रण आहे.

पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांनी पोलीस आयुक्त पदाचा पदभार सांभळल्यानंतर काही महत्वाचे निर्णय घेतले आहेत. ऑक्टोबरमध्ये त्यांच्या मार्गदर्शनात आयुक्तालयात एमसीयू विभागसुरू करण्यात आला. या विभागाचे महत्वाचे काम हे प्रत्येक गुन्हेगारांची माहित संकलन करण्याचे आहे.आयुक्तालयातील १० पोलीस ठाण्यांतर्गत कुठल्याहीगंभीर गुन्ह्यातअटक झालेल्या आरोपीना प्रथम एमसीयू विभागात आणले जाते. तसेच त्यांचे ३० ते ६० डिग्रीमध्ये वेगवेगळ्या प्रकारचे ६ फोटो काढले जातात. त्यानंतर प्रत्येक गुन्हेगारांचे आय राईज व आधारकार्डची नोंद घेतली जाते. तसेच पोक्सोच्या गुन्ह्यातील आरोपींचे ब्लड ग्रुप व डीएनएची नोंद घेतली जाते. संबंधित विभाग पुणे सीआयडी विभागाअंतर्गत येत असून ही संग्रह केलेली सर्व माहिती ऑनलाईन आहे. त्यामुळे नोंद झालेल्या प्रत्येक गुन्हेगारांची माहिती पुणे सीआयडी येथील अधिकारी पाहू शकतात. याविभागामुळे पोलिसांच्या तपासाला एक संजीवनी मिळाली आहे. गुन्हेगाराने वेश बदलवून किंवा चेहऱ्यावर दुप्पटा बांधून गुन्हा केला असेल तरी पोलीस तपासात अडथळा निर्माण होणार नाही. गुन्हेगारांचे आय राईज घेतल्यामुळे तो पकडला जाणार आहे. तसेच सीसीटीव्ही कॅमेऱ्यातसुध्दा गुन्हेगार टिपला गेला तरी पोलीस त्याला तत्काळ अटक करू शकतील, अशी सुविधा एमसीयूमध्ये आहे. एखाद्या आरोपीने किती व कोणकोणत्या प्रकारचे गुन्हे केले आहेत, याची सर्व नोंद घेतली जात आहे. आतापर्यंत शहरातील २०० गुन्हेगारांची नोंद एमसीयू विभागात झाली असून दरदिवसाला गुन्हेगारांची नोंद करणे सुरू आहे. सध्या या युनिटमध्ये पाच कर्मचारी कार्यरत असून आणि येणाऱ्या काळात तीन डिव्हीजनमध्ये एमसीयू विभाग गठीत होणार असल्याची माहिती आहे.

# कौंडण्यपूरमध्ये वाढते अपघात:सार्वजनिक बांधकाम विभागाकडून अद्याप कार्यवाही नाही

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६अमरावती–** आर्वी–अमरावती मुख्य राज्य महामार्गावरील कौंडण्यपूर हद्दीत अपघातांची संख्या वाढल्याने चिंता व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर, येथे गतिरोधक बसवण्याची मागणी पुन्हा एकदा सार्वजनिक बांधकाम विभागाकडे करण्यात आली आहे. गटग्रामपंचायतीने यापूर्वीही निवेदन दिले होते, मात्र अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नाही.

गटग्रामपंचायतीच्या नोंदीनुसार, गेल्या महिन्यात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या तिवसा येथील कार्यालयात निवेदन सादर करण्यात आले होते. त्यानंतर ५ डिसेंबर रोजी स्थानिक तरुणांनी पुन्हा एक निवेदन सादर करत संबंधित अधिकाऱ्यांना येथील



अपघातांची आठवण करून दिली. सहा महिन्यांपूर्वीही याच स्वरूपाचे निवेदन देण्यात आले होते, परंतु त्यावरही कोणतीही कारवाई झाली नव्हती.

कौंडण्यपूर हे विठ्ठल रुक्माईचे माहेरघर असल्याने येथे वर्षभर भाविकांची गर्दी असते. कौंडण्यपूर बस स्टॉप, अंजनसिंगी रोडचे वळण, नवीन बस स्टॉप, मूर्तीजापूर–तरोडा रोड चौफुली, मुख्य गावात येणाऱ्या रोडवरील टी पॉईंट, विठ्ठल रुक्मिणी मंदिराकडे जाण्याचा मार्ग, ग्रामचौक आणि बाजार परिसर यांसारख्या वर्दळीच्या ठिकाणी दररोज मोठ्या प्रमाणात पादचारी, विद्यार्थी व भाविकांची रहदारी असते.

संपूर्ण मार्गावर एकही गतिरोधक नसल्याने वाहने भरधाव वेगात धावतात. यामुळे अपघातांची मालिका वाढली असून, छोटे–छोटे अपघात नित्याचेच झाले आहेत. तरुणांनी मागणी केली आहे की, कौंडण्यपूरच्या सीमा भागातील मुख्य चौक, शाळा परिसर, तीर्थक्षेत्राचे प्रवेशद्वार आणि वर्दळीच्या भागांत योग्य दर्जेदार गतिरोधक बसवण्यात यावेत. तसेच वेगमर्यादा फलक आणि पथदिवे यांसारख्या सुविधा तातडीने उपलब्ध करून द्याव्यात. स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे की, मोठ्या अपघाताची आणि जीवितहानीची वाट न पाहता, सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने उपाययोजना कराव्यात. सध्या होत असलेल्या लहान अपघातांवरून भविष्यातील मोठ्या धोक्याची शक्यता लक्षात घेऊन प्रतिबंधात्मक पावले उचलणे आवश्यक आहे.निवेदन सादर करतेवेळी चंदू अर्मळ, पवन नागमोते, मंगेश गोरडे, प्रशांत जगताप, प्रमोद उईके, अंकुश देऊळकर, प्रफुल्ल देऊळकर आणि अमोल पुंडेकर आदी उपस्थित होते.

# ४ हजार २५६ लाभार्थ्यांना पी. आर. कार्ड, फ्लॅट, घरकुल योजनांचा लाभ

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१६अमरावती** मुख्यमंत्री तसेच पालकमंत्री यांच्या मार्गदर्शनाखाली आमदार रवी राणा यांच्या पाठपुराव्यातून प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत एकूण ४,२५६ लाभार्थ्यांना लाभ मंजूर करण्यात आला आहे.

घटक क्रमांक ३ अंतर्गत ८२५ झोपडपट्टीधारकांना पात्रता कार्डाचे वाटप करण्यात आले. यामध्ये जया ८६० प्लेट अंतर्गत लाभार्थ्यांचा समावेश आहे. तसेच पी.आर. कार्ड अंतर्गत आदिवासी नगर, पाच बंगला, कपिलवस्तू नगर येथील ३०५ लाभार्थ्यांना कार्डाचे वितरण करण्यात आले. याशिवाय, १,२०० घरकुलांच्या सभासदांना घटक क्रमांक ४ अंतर्गत लाभ देण्यात आला आहे. बीएमसी अंतर्गत एकूण ४,२५६ लाभार्थ्यांना प्रधानमंत्री आवास योजनेचा



लाभ मंजूर झाला असून एमआयएस प्रणालीवरून मंजुरी काढण्यात आली. या कार्यक्रमाला जिल्हाधिकारी डॉ. आशिष येरेकर, महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळीआ.रवी राणा,आ.संजय खोडके,आ.सुलभाताई खोडके यांच्या हस्तेलाभार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमात भाजपा शहर अध्यक्ष डॉ. नितीन धांडे,भाजपचे बादल कुलकर्णी आदींची उपस्थिती होती. यावेळी आमदार रवी राणा यांनी शासनाच्या घरकुल योजनांचा लाभ गरजू व पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रशासनाने केलेल्या कार्याचे कौतुक केले तसेच भविष्यातही नागरिकांच्या हक्काच्या घरासाठी आपला पाठपुरावा सुरूच राहील, असा विश्वास व्यक्त केला

# भरधाव कारने शेतकऱ्याला चिरडले

## तिवसा येथील वणी फाट्यानजिकची घटना

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६तिवसा –** महामार्ग ओलांडून जात असलेल्या एका ५४ वर्षीय शेतकऱ्याला भरधाव कारने चिरडल्याची घटना सोमवारी (दि.१५) रात्री ७ वाजताच्या सुमारास नागपूर–अमरावती महामार्गावरील वणी फाट्याजवळ घडली.



या अपघातात शेतकऱ्याचा जागी मृत्यू झाला. प्रदीप लक्ष्मणराव मकेश्वर (रा. तिवसा) असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे.

एमएच ३२ एएस ७८८४ क्रमांकाची एक्सव्ही कार ही नागपूरहून अमरावतीच्या दिशेने जात होती. याच दरम्यान प्रदीप मकेश्वर शेतातून पायी महामार्ग ओलांडून जात असताना भरधाव कारची जोरदार धडक बसली. यात मकेश्वर यांच्या डोक्याला व छातीला गंभीर मार लागला आणि यातच त्यांचा घटनास्थळी मृत्यू झाला. तिवसा पोलिसांनी कारचालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# विदर्भात घरोघरी सोल्याची भाजी,विविध प्रकारच्या सोल्याच्या भाज्यांच्या बेत

## शेतशिवारात तुरीचा बहर, घरोघरी सोल्याची भाजी

**सुनील घोरमाडे**

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६तिवसा**

दिवाळीचा सण संपताच शेतशिवारात तुरीचे पीक बहरायला लागते आणि ग्रामीण जीवनात एक खास ऋतू सुरू होतो–तुरीच्या ओल्या दाण्यांच्या भाजीचा! तुरीच्या झाडांवर उमललेला पिवळाधम्म फुलोरा पाहताच ग्रामीण भागासह शहरातील खवय्यांच्या तोंडाला पाणी सुटते. या दिवसांत तुरीच्या ओल्या दाण्यांची, शेंगांची आणि फुलांची चवदार भाजी म्हणजे जणू घराघरातील खास मेजवानीच ठरते.ग्रामीण भागात तुरीच्या ओल्या दाण्यांच्या भाजीला 'सोल्याची भाजी' असे म्हटले जाते. सध्या घरोघरी गृहिणींच्या स्वयंपाकघरात तुरीच्या दाण्यांना विशेष स्थान मिळाले आहे. फुलांची भाजी, शेंगांची उसळ, वाफाळलेली शेंगाची भाजी किंवा उकडलेल्या शेंगा–तुरीपासून तयार होणाऱ्या विविध पदार्थांनी थंडीच्या दिवसांत जिभेचे चोचले पुरवले



जात आहेत. त्यामुळे सध्या ग्रामीण भागात सोल्याच्या भाजीचीच धूम पाहायला मिळते.तुरीच्या शेंगा केवळ चवीसाठीच नव्हे तर पौष्टिकते–साठीही अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जातात. भारतीय स्वयंपाकात परंपरेने वापरल्या जाणाऱ्या तुरीच्या शेंगांमध्ये भरपूर पोषणमूल्ये असल्याने त्या शरीराला उष्णता, ऊर्जा आणि शक्ती देतात. हेमंत ऋतूमध्ये तुरीच्या शेंगांचे सेवन केल्याने थंडीच्या दिवसांत शरीर तंदुरुस्त राहते, असे वयोवृद्ध मंडळीकडून सांगण्यात येते. म्हणूनच या हंगामात तुरीच्या शेंगा प्रत्येकाच्या आहारात आवर्जून समाविष्ट केल्या जातात.सध्या बाजारपेठेत हंगामी ताजा भाजीपाला दाखल होत असून त्यात वाल, पोपट राजमा, चवधारी वाल, वाटाणा यांसह तुरीच्या शेंगांची मोठ्या प्रमाणात भर पडलेली दिसते. जिभेला चव आणणाऱ्या या शेंगा ग्रामीण तसेच शहरी भागातही मोठ्या उत्साहात खरेदी करतात किंवा आपल्या अत्यंत जवळीक संबंध असलेल्या शेतकरी किंवा नातेवाईकांकडून आणल्या जाते.पूर्वी दळणवळणाची साधने मर्यादित असल्याने ग्रामीण भागात भाजीपाल्याचे प्रमाण कमी असे. त्या काळी शेतशिवारात पिकणाऱ्या शेंगांच्या दाण्यांची भाजी हा उत्तम पर्याय ठरला आणि ही परंपरा आजही खेड्यापाड्यात कायम आहे. दिवसभर गृहिणी उन्हात बसून तुरीच्या शेंगांतून दाणे काढताना दिसतात आणि सायंकाळच्या जेवणात त्याचा वापर केला जातो. काही भागात महिला थेट शेतात जाऊन शेंगा तोडतात, तर पुरुष मंडळी तुरीच्या डहाळ्या तोडून घरी आणतात. या प्रक्रियेला ग्रामीण भाषेत 'तूर झाडणे' असे म्हटले जाते.गावाकडून शहरात वास्तव्यास असलेल्या नातेवाईकांना किंवा मित्रमंडळींना तुरीच्या ताज्या शेंगा आवर्जून पाठवल्या जातात. गावची चव आणि मातीचा गंध शहरात पोहोचवणारा हा जणू जिव्हाळ्याचा सोहळाच असतो.

# मेळघाटात आता आरोग्यदूत अवतरणार!

## चल चिकित्सालयाचे आज लोकार्पण, हेडगेवार जन्मशताब्दी सेवा समितीचा उपक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६धारणी –**शासनातर्फे आरोग्य सेवा तथा वैद्यकीय कामासाठी शेकडो वाहने उपलब्ध करण्यात आले असतान सुद्ध कुपोषण, बालमृत्यू, मातामृत्यूव अर्भकमृत्यूवर नियंत्रण झाले नाही. वैद्यकीयदृष्ट्धा कमी गंभीर रोगांमुळे पण बालमृत्यू होत असतात असा आजवरचा अनुभव असल्यानेच हेडगेवार जन्मशताब्दी सेवा समितीने मेळघाटच्या अतीदुर्गम गावात प्राथमिक आरोग्य सेवा पोहोचविण्यासाठी आरोग्यदूतांमार्फत वैद्यकीयसेवा उपलब्ध करण्याचा निर्णय घेतला आहे.

अकोला येथील हेडगेवार जन्मशताब्दी सेवा समितीनेता धारणा येथील मागोवा



छात्रावासच्या नेतृत्वात आरोग्यदूत दुर्गम भागात वैद्यकीय सेवा देणार आहे. छात्रावास समितीचे वैद्यकीय सेवा देणार आहे. छात्रावास समितीचे आरोग्यदूतांबद्दल माहिती देताना सविस्तर कार्ययोजना स्पष्ट केली. स्व. शंकरराव तत्ववादी यांच्या आयुष्यातील उत्पन्नातून ३० लाख रूपये फिरता दवाखाना (चल चिकित्सालय) साठी फिरता दवाखाना (चल चिकित्साल उपयोग करणाऱ्या समितीकडे राहणार आहे.

धारणी असून तपासणीची सोय आहे. यांनी जन्मशताब्दीसाठी धन उपलब्ध केले बठवतील स्व शंकरराव तत्ववादी है आरोग्य भारतीचे काम करीत होते किशोर तत्ववादी आहे या वाहनात अनेक वैद्यकीय उपकरणे१६ डिसेंबर रोजी लोकार्पण सोहळा असून कार्यक्रमाचे अध्यक्षपदी डॉ. पंकज सातनकर असतील. प्रमुख अतिथी म्हणून दीपक तामशेट्टीव चंद्रशेखर राठी, धारणीचे रमेश मालवीय तथा रामदास जयस्वाल उपस्थित राहतील. हरीगोविंद छात्रावास येथेच आरोग्यदत चल चिकित्सालय वाहन उपे राहणार असून येथूनच संचालन होईल आठवड्याचे तीन दिवस धारणी तालुका व तीन दिवस चिखलदरा तालुक्यात आरोग्यदूत तेसवा देणार आहेत. हे विशेष. प्रकल्प सेवा समितीतर्फे मुलभूतवैद्यकीय सेवा देण्याच्या प्रयत्नांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# माणुसकीला काळीमा, कर्ज फेडण्यासाठी शेतकऱ्याची किडनी विकली, चंद्रपुरातील धक्कादायक प्रकार




**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६चंद्रपूर**

कर्जाचा परतावा करण्यासाठी सावकारांनी शेतकऱ्याला किडनी विकायला लावली.या क्रूर प्रकाराणे महाराष्ट्र हादरला आहे. नागभीड तालुक्यामधील मिंथुर गावात हा प्रकार घडला आहे. बळीराजाची वेदना बघून दगडालाही पाझर फुटेल. मात्र सरकार, प्रशासनाला बळीराजाचे आभाळाएवढे दुःख कधी दिसलेच नाही. केवळ आकड्याचा खेळ पुढे ठेवून सरकार टाळ्या पदरी पाडत असते. चंद्रपूर जिल्हातील या कर्जबाजारी शेतकऱ्याची वेदना आभाळाला भिडणारी आहे.

सावकारी कर्जाचा जाळ्यात अडकलेल्या या शेतकऱ्याला कर्ज फेडण्यासाठी स्वतःची किडनी विकण्याचा वेदनादाई प्रसंग ओढवला. रोशन सदाशिव कुडे असे या शेतकऱ्याचे नाव आहे. ते चंद्रपूर जिल्हातील मिंथुर गावातील रहिवाशी आहेत. निसर्गाला जिंकणारा बळीराजा सावकारीला पुरता हरला आहे. रोशन यांच्याकडे चार एकर शेती आहे. या शेतीवरच त्यांचा कुटुंबाच्या उदरनिर्वाह चालतो. निसर्गाचा लहरीपणामुळे शेती फायदेशीर ठरली नाही. त्यामुळे शेतीपूरक व्यवसाय करण्याचे त्यांनी ठरविले.

दुग्ध व्यवसायातून थोडी मिळकत होईल म्हणून त्यांनी दुधाळ गाई खरेदी केल्यात. यासाठी त्यांनी दोन सावकाराकडून ५०-५० हजार रुपये घेतले. येथेही त्यांना नशिबाने धोका दिला. खरेदी केलेल्या गाई मरण पावल्यात.त्यात शेतीही पिकेना. कर्जाचा डोंगर वाढत गेला. सावकार घरी येऊन नको ते बोलू लागलेत.कर्जातून मुक्त होण्यासाठी त्यांनी दोन एकर जागा विकली.ट्रॅक्टर आणि घरातील सामान विकले. मात्र कर्ज काही संपेना.

**८ लाखाला विकली किडनी**

एक लाखाचे ७४ लाखावर गेले. शेवटी कर्ज घेतलेल्या एका सावकाराने किडनी विकण्याचा सल्ला दिला. एका एजंटने रोशन कुडे यांना कलकत्ता येथे नेले. कुडे यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. तपासणीनंतर कंबोडिया येथे त्यांच्यावर शस्त्रक्रिया झाली आणि किडनी काढण्यात आली. ही किडनी कुडे यांनी आठ लाखाला विकली.

# मनपा निवडणुकीसाठी प्रशासनाची तयारी

## ७ निवडणूक निर्णय अधिकार्यांसह २१ सहायक निवडणूक राहणार : निवडणूक अधिकारी सौम्या शर्मा यांचे आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६अमरावती**

अमरावती महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी निवडणूक अधिकारी सौम्या शर्मा यांनी सात निवडणूक निर्णय अधिकार्यांची नियुक्ती केली आहे. त्यांच्यासोबत प्रत्येकी ३ असे एकूण २१ सहायक निवडणूक निर्णय अधिकार्यांची नियुक्ती केली आहे. निवडणूक निर्णय अधिकारी व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी हे निवडणूक आयोगाच्या वेळोवेळी निर्गमित असलेल्या आदेशानुसार कर्तव्य व जबाबदार्या पार पाडाव्या लागणार आहे.

निवडणूक अधिकारी सौम्याशर्मा यांच्या नेतृत्वात उत्तर झोन १ रामपुरी कॅम्प अंतर्गत १. शेगाव रहाटगाव, २ संत गाडगेबाबा-पीडीएमसी, ५ महेंद्र कॉलनी नविन कॉटन मार्केट या प्रभागात निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून उपजिल्हाधिकारी पुर्नवसन श्रद्धाउदावंत यांचीनियुक्ती केली. तर त्यांच्या सोबत सहायक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून शारंग ढोमसे, नंदकिशोर तिखीले, आशिष अवसरे जबाबदारी पार पाडतील.

नवीन तहसील रोड कार्यालयांतर्गत प्रभाग ३ नवसारी, ४-जमील कॉलनी लालखडी, ५ जवाहर स्टेडीयम मध्ये निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून उपविभागीय अधिकारी अनिल भटकर यांची नियुक्ती केली. त्यांच्यासोबत विजय लोखंडे, डॉ. सचिन बोंद्रे, दिनेशहंबर्डे हे सहायक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून राहतील.



झोन क्रमांक दोन राजापेठ अंतर्गत प्रभाग ११ फ्रेजरपुरा रुक्मिणी नगर, १२-स्वामी विवेकानंद कॉलनी बेलपुरा १८- राजापेठ संत कंवररामध्ये निवडणूक निर्णय अधिकारी दुर्गा देवरे उपजिल्हाधिकारी भूसंपादन यांच्याकडे जबाबदारी सोपविली आहे. तर त्यांच्या सोबत अजय मांडवे, श्रीकांत चव्हाण आणि मंगेश कडू हे सहायक निवडणूक निर्णय अधिकारी राहतील. मध्य झोन ३ दस्तूर नगर या अंतर्गत प्रभाग ८ जोग स्टेडियमचपराशीपुरा, ९-एसआरपी एफ वडाळी, १० बेनोडा भीम टेकडीमध्ये निवडणूक निर्णय अधिकारी प्रसन्नजीत चव्हाण उप जिल्हाधिकारी भूसंपादन यांची नियुक्ती केली आहे. प्रियंकामिसाळ, नितीन बोबडे आणि नितीन भटकर जबाबदारी सांभाळतील. शिक्षण विभाग अंबापेठ अंतर्गत प्रभाग-६ सहा विलास नगर, मोरबाग, गवळीपुरा, १३- अंबापेठ गौरक्षण नमुना, १७ गडगडेश्वर रवी नगर या प्रभागाचे निवडणूक निर्णय अधिकारी विवेकानंद काळकर वन जमाबंदी अधिकारी यांच्या नेतृत्वात रवी महाले, अमित डेंगरे, प्रमोद इंगोले १५-छाया नगर यांची नियुक्ती केली आहे. पश्चिमझोन क्रमांक पाच भाजी बाजार अंतर्गत प्रभाग क्रमांक १४ जवाहर गेट बुधवारा, पठाणपुरा, १६ अलीम नगर रहेमत नगर प्रभागाची निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून संतोष काकडे निवासी उपजिल्हाधिकारी यांची नियुक्ती केली आहे. सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून निलेश खटके, मनोहर शहाळे, विवेक देशमुख यांची नियुक्ती केली.

झोन क्रमांक ४ बडनेरा अंतर्गत प्रभाग क्रमांक १९ साईनगर अकोली, २० सूतगिरणी सामरा नगर, २१ जुनीवस्तीबडनेरा, २२ नवीवस्ती बडनेराचे निवडणूक निर्णय अधिकारी विवेक जाधव उपजिल्हाधिकारी महसूल हे राहतील. त्यांच्या सोबत निकिता जावरकर, धनंजय शिंदे आणि श्रीरंग तायडे हे सहायक निवडणूक निर्णय अधिकारी राहतील.

# १२ तासांत खुनाचा क्लिष्ट गुन्हा उघडकीस

## चार आरोपींना अटक; अमरावती शहर गुन्हे शाखेची धडाकेबाज कारवाई



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६अमरावती**

अमरावती शहरात घडलेल्या खुनाच्या क्लिष्ट गुन्ह्याचा अवघ्या १२ तासांच्या आत छडा लावत अमरावती शहर गुन्हे शाखेने चार आरोपींना अटक केली आहे. दिनांक १५ डिसेंबर २०२५ रोजी पोलीस स्टेशन खोलापुरी गेट येथे फिर्यादी विनीत पवन वानखडे (वय १९, रा. खडकाडीपुरा, अमरावती) यांनी तक्रार दिली होती. त्यांच्या वडील पवन वानखडे यांना जुन्या वादाच्या कारणावरून भाजी बाजारात बोलावून वाद घालून चाकूने वार करत निर्दयपणे हत्या करण्यात आली, असे तक्रारीत नमूद आहे.

या प्रकरणी आरोपी वैभव पत्रे, साहिल हिरपुरकर, शुभम ढोले, सुशिल ढोले व विशाल ढोले (सर्व रा. अमरावती) यांच्याविरुद्ध पोलीस स्टेशन खोलापुरी गेट येथे गुन्हा क्र. ३२३/२०२५ अन्वये भा. न्या. सं. चे विविध कलम लावून गुन्हा दाखल करण्यात आला.

गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदिप चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने गुप्त बातमीदारांच्या मदतीने खात्रीशीर माहिती मिळवून आरोपी वैभव उर्फ समीर उर्फ चिकण्या गणेश पत्रे, साहिल आत्माराम हिरपुरकर, सुरज प्रमोद पिंडेकर व सौरभ कैलासराव विजयकर यांना भुसावळ, जिल्हा जवळगाव येथून ताब्यात घेतले. पुढील तपासासाठी आरोपींना पोलीस स्टेशन खोलापुरी गेट यांच्या ताब्यात देण्यात आले आहे.



# जगविख्यात लोणार सरोवरातील कमळजा देवीचं मंदिर पाण्यात

## कडाक्याचा थंडीतही जल पातळीत वाढ

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६बुलढाणा**

हजारो वर्षांपूर्वी अवकाशातील घडामोडीमुळे निर्मित आणि आजच्या संगणक व कृत्रिम बुद्धिमत्तेच्या काळातही विविध विज्ञान शाखातील, वैज्ञानिक, संशोधकांना एक आव्हान ही देखील लोणार येथील जगप्रसिद्ध सरोवरची ओळख आहे.

खाऱ्या पाण्याच्या या सरोवराचे आजवरच्या दीर्घ काळात संशोधन झाले. मात्र आजमितीसही अनेक बाबींचा उलगडा होऊ शकला नाही. येथील धारा तिर्थ (गोमूख धार), सरोवर परिसरातील जैविक विविधता आणि विविध स्थापत्य शैलीची मंदिरे, दैत्यसूदन मंदिरातील विष्णूच्या मूर्तीवर वर्षातून ठराविक काळात होणारा सूर्य किरणांचा वर्षाव ( किरणोत्सव) हे सरोवरचे रहस्य अधिकच गूढ करतात.

वेळोवेळी करण्यात आलेल्या संशोधनानुसार या सरोवराची निर्मिती कमी अधिक ५२ हजार वर्षांपूर्वी झाली आहे. आघाडीवरील आयआयटी पवई (मुंबई ) च्या पथकाने देखील लोणार सरोवरचा अभ्यास केला होता. सरोवरात आढळणारे व चंद्रा वरील खडकात आढळलेले 'मिनरल्स' यात साम्य आढळून आले आहे.

जगातील अति दुर्मिळ सरोवरा पैकी एक असलेले हे सरोवर केंद्र, राज्य शासन, संशोधन संस्था पुरातत्व विभागाच्या अनास्थेचा देखील बळी ठरला आहे. यंदाच्या वर्षी सरोवरातील पाण्याच्या पातळीत सातत्याने होणारी वाढ एकाच वेळी कुतूहल, चिंता, चिंतन आणि व्यापक संशोधनाचा विषय ठरला आहे. मागील सहा महिन्यापासून खाऱ्या पाण्याच्या लोणार सरोवरातील पाण्याच्या पातळीत प्रचंड वाढ होताना दिसत आहे. यंदाच्या पावसाळ्यात लोणार परिसरासह तालुक्यात विक्रमी पावसाची नोंद झाली. वेळोवेळी अतिवृष्टी झाली. यामुळे पावसाळ्यात झालेल्या सरोवर जल पातळीला फारसे गंभीर्याने घेण्यात आले नसावे. मात्र आता कडाक्याच्या हिवाळ्यातही सरोवरची जल पातळी वाढतच असल्याचे चिंता जनक चित्र आहे.

# सामूहिक प्रार्थनेने बुलढाण्यातील 'दिनी इज्तिमा'ची सांगता

## तीन दिवसांत लाखावर मुस्लीम बांधवांची हजेरी



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६बुलढाणा**

बुलढाणा खामगाव राज्य मार्गावरील पोखरी फाटा परिसरात आयोजित तीन दिवसीय 'दिनी इज्तिमा'चा आज सोमवारी, १५ डिसेंबर रोजी दुपारी सामूहिक दुआने समारोप झाला. बेरार प्रांताचा हा धार्मिक मेळावा १३ ते १५ डिसेंबर दरम्यान शांततेत आणि कोणत्याही अडचणीशिवाय पार पडला.या तीन दिवसांत अमरावती विभागातील अमरावती, अकोला, बुलढाणा, यवतमाल आणि वाशिम या पाच जिल्ह्यांतील लाखावर मुसलमान बांधव या कार्यक्रमासाठी एकत्र आले होते.संपूर्ण कार्यक्रम शांततेने पार पडला, कोणताही गदारोळ किंवा घोषणाबाजी नव्हती आणि याचा प्रशासनावर कोणताही बोजा पडला नाही.

तब्लिगी जमातच्या दिल्लीतील मरकज हजरत निजामुद्दीनच्या मार्गदर्शनाने हा तीन दिवसीय इज्तिमा आयोजित करण्यात आला होता. सुमारे दिड महिन्यांपासून या इज्तिमाची तयारी सुरू होती. १०० एकर जमिनीवर विशाल शाम्यिाना , विद्युत सुविधा , शौचालये, स्नानगृह, 'वजूखाने', वाहनतळ, बाजार आणि भोजनाची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती.

१३ डिसेंबर रोजी 'फज्र'च्या नमाजनंतर इज्तिमा सुरू झाला. दिल्ली आणि इतर ठिकाणाहून आलेल्या उलमांनी उपस्थितांना हजरत मुहम्मद (स.) यांनी सांगितलेल्या मार्गावर मार्गक्रमण करीत नमाज पढण्याचा संदेश दिला. समारोपप्रसंगी मौलाना महमूद अली यांनी सामूहिक दुआ करवली, त्यांनी पापां पासून दूर राहणे आणि नमाजाची पाबंदी करण्याचा उपदेश दिला.

**उत्तम नियोजन व सुविधा**

इज्तिमात येणाऱ्यांना कोणतीही अडचण येऊ नये यासाठी आयोजकांनी लहान सहान गोष्टींकडे लक्ष दिले. विविध कामांसाठी स्वयंसेवकांच्या चमु तयार करून जबाबदाऱ्या सोपवल्या होत्या. गेल्या तीन दिवसांतहजारो स्वयंसेवक रात्रंदिवस कार्यरत होते.

भाविकाचे आरोग्य बिघडले तर तात्काळ उपचार मिळावेत यासाठी जिल्हा शल्य चिकित्सकांनी १० बेडचे तात्पुरते रुग्णालय उभारले होते. सरकारी डॉक्टरांव्यतिरिक्त शहरातील मुस्लिम डॉक्टरांनी सेवा दिली. बुलढाणा शहरातील मुस्लिम डॉक्टर आणि फार्मासिस्टांनी स्वतःच्या खर्चाने औषधे उपलब्ध करून दिली होती.

# अल्पवयीन प्रेयसी गर्भवती प्रियकरावर गुन्हा दाखल

## अल्पवयीन असल्याने वडिलांचा लग्नास नकार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६अमरावती**

मुलगी अल्पवयीन असल्यामुळे तीच्या वडीलांनी लग्नासाठी विरोध केला होता. मात्र तरीही अल्पवयीन मुलीने तीच्या प्रियकरासोबत पळ काढला. तसेच ती काही महिने प्रियकरासोबत एकत्रीत राहीली यातून तिला गर्भधारणा झाली. दरम्यान ती अल्पवयीन असल्याचे लक्षात येताच पोलिसांनी तीच्या प्रियकराविरुध्द १३ डिसेंबरला बलात्कार व पोस्कोचा गुन्हा दाखल केला.चिखलदरा तालुक्यातील एका गावात ही घटना उघड झाली. १५ नोव्हेंबर २०२३ ते १२ डिसेंबर २०२५ दरम्यान ती घटना घडल्याचे पिडीत अल्पवयीन मुलीने तक्रारीत नमुद केले आहे. याप्रकरणी चिखलदरा पोलिसांनी ३० वर्षीय तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल केला. या तरुणाने २०२३ मध्ये त्या सोळा वर्षीय मुलीला तीच्या घरी जाऊन लग्नाची मागणी घातली होती. मात्र त्यावेळी मुलीचे वय कमी असल्यामुळे तिच्या वडिलांनी लग्नास नकार दिला. मात्र ती मुलगी व आरोपी एकमेकांना पसंत करत होते. परस्परांच्या प्रेमात बुडाले होते. त्यामुळे तक्रारदार पिडीत मुलगी ही स्व मर्जीन पळून जात तीच्या प्रियकराच्या घरी जाऊन राहू लागली.दरम्यान ते पती पत्नीप्रमाणे सायला लागले. त्यामुळे तिला गर्भधारणा झाली. दरम्यान ती अचलपूर उपजिल्हा रुग्णालयात तपासणी करिता गेली असता डॉक्टरांनी ती गर्भवती असल्याचे निदान केले. त्याचवेळी ती अल्पवयीन असल्याचे डॉक्टरांच्या लक्षात आले. ती माहिती बाल संरक्षण समितीसह चिखलदा पोलिसांना देण्यात आली. चिखलदरा पोलिसांनी १३ डिसेंबरला या मुलीच्या प्रियकरा विरुध्द गुन्हा दाखल केला.

# धारणीतील ९० लाखांच्या अंडीपुरवठा बनावट देयके प्रकरणी एफआयआर कधी होणार?

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६अमरावती**

धारणी येथील एकात्मिक प्रकल्प अधिकारी कार्यालय अधिनस्थ आश्रमशाळांना ९० लाखांच्या अंडी बनावट देयके प्रकरणी पुन्हा एफआयआर होणार असल्याची विश्वसनीय माहिती आहे. या बनावट देयके प्रकरणात कंत्राटदारांसह काही कर्मचारी देखील सहभागी असल्याचे प्राथमिक अहवालातून समोर आले आहे. आता हे प्रकरण पुन्हा लवकरच पोलिसांत जाणार आहे.

आदिवासी विकास विभाग अधिनस्थ धारणी एकात्मिक प्रकल्प अधिकारी कार्यालयातून ३ जून २०२४ रोजी खिडकी कटरने कापण्यात आली. नेमके ज्या आलमारीत बनावट अंडी, केळी देयकांची फाइल होती, तेच कपाट तोडून फाइल लंपास करण्यात



आली होती. मात्र अंडीचा पुरवठा झालाच नाही तरीही ९० लाखांची बनावट देयके प्रकरणाची बाब माहिती अधिकार प्राप्त अर्जानंतर हे बिंग फुटले. याप्रकरणी धारणी पोलिसांत तक्रार नोंदविली गेली. मात्र, संबंधितांनी हे प्रकरण मॅनेज करून चौकशीच्या नावे थंडबस्त्यात टाकले होते. मात्र आता हे प्रकरण पुन्हा तापणार आहे.

**आश्रमशाळांतून पावती, कागदपत्रांची जुळवाजुळव**

धारणीचे प्रकल्प अधिकारी सिद्धार्थ शुक्ला यांनी वरिष्ठांच्या निर्देशानुसार २० लाखांचे बनावट अंडी देयकाच्या प्रकरणाचा नोव्हेंबर २०२५ पासून नव्याने तपास चालविला आहे. आश्रमशाळातून अंडी पुरवठ्याची पोच पावती, मुख्याध्यापकांचा शेरा आदी कागदपत्रे जुळवाजुळव पथकाद्वारे केली जात आहे.

**कंत्राटदारांसह त्रिकुटांचा सहभाग**

जळगाव येथील श्री स्वामी समर्थ पुरवठादाराच्या नावे अंडी पुरवठ्याची बनावट देयके काढण्यात त्रिकुटाचा सहभाग आहे. यातील 'मास्टर माइंड' हल्ली अमरावतीत आहे. ९० लाखांची अंडी देयके कशी काढायची, ती फाइल केव्हा पीओंच्या समोर मंजुरीसाठी ठेवायची हे सर्व मॉनिटरिंग कळमनुरीतून केल्याची माहिती आहे. स्वामी समर्थचे लागेबांधे धारणी पीओ ते अमरावती एटीसी असे आहेत. यात एका महिला गृहपालाचे 'चोरी चोरी, चुपके चुपके' प्रकरणदेखील आहे.

# कुशलपेक्षा अकुशलचा सर्वाधिक निधी; शासनाकडे पाठपुरावा सुरू

## मग्रारोहयोवर ५९ हजार ५६७ हातांना काम

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६अमरावती**



जिल्ह्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने (मनरेगा) चा ७२ कोटी ४२ लाख ४८ हजार २४३ रुपयांचा निधी शासनाकडे थकीत आहे. यामध्ये मजुरांचे केवळ ३ कोटी ६४ लाख ४१ हजार मजुरांचे, तर ६८ कोटी ७८ लाख ०६ हजार २५८ रुपयांचा मटेरिअलचा निधी अद्याप उपलब्ध झालेला नाही. अशातच सध्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कामांवर ५९ हजार ५६७ मजुरांची उपस्थिती आहे. त्यामुळे यांच्या हाताला काम मिळाले आहे. काही दिवस रोहयोच्या कामावर घटलेली मजूर उपस्थिती आता विविध कामांमुळे वाढू लागली आहे. मग्रारोहयो त मागील काही दिवसांत वेळेवर रक्कम मिळत नसल्याची असलेली ओरड अद्यापही कायम आहे. मोठ्या प्रमाणात थकबाकी असलेली रक्कम आता कमी झाली आहे. यामध्ये मजुरांचे केवळ ३ कोटी ६४ लाख ४१ हजार रुपये आहेत. सर्वाधिक ६८ कोटी ७८ लाख ०६ हजार २५८ रुपयाची रक्कम ही मटेरिअलचा आहे. आता मात्र मजुरांच्या खात्यावर ३ कोटी ६४ कोटी ४१ रुपये पडणे बाकी आहे. मटेरियलवरील खर्चापोटीची ६८ कोटी ७८ लाख ०६ हजार २०५८ रुपयांची रक्कम शासनाकडून मिळणे बाकी आहे, तर अशातच दिवाळीनंतर काही दिवस रोहयोच्या कामावर घटलेली मजूर उपस्थिती आता विविध कामांमुळे वाढू लागली आहे. १० डिसेंबरच्या अहवालानुसार जिल्ह्यात रोजगार हमी योजनेच्या सर्व यंत्रणा मिळून सुरू असलेल्या ५ हजार ७४४ कामांवर ५९ हजार ५६७ इतके मजूर कामावर हजर होते.

**लवकरच निधी उपलब्ध होणार**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या प्रलंबित निधीबाबत शासनाकडे पाठपुरावा सुरू आहे. लवकरच हा निधी प्राप्त होईल. निधी उपलब्ध होताच नियमानुसार वितरित केला जाईल.ज्ञानेश्वर घ्यार, उपजिल्हाधिकारी रोहयो.

# मेळघाटातील प्रत्येक गावातून आलेल्या आदिवासी बांधवांची झाली ऐतिहासिक 'संसदवारी'

## खासदार बळवंतराव वानखडे यांचा स्तुत्य उपक्रम : प्रियंका गांधी व के.सी. वेणुगोपाल यांच्या भेटीने आदिवासी बांधव भारावले;जीवनात पहिल्यांदाच अनुभवली राजधानी दिल्ली




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६नवी दिल्ली**

ज्यांनी आजवर आपल्या गावाची वेस कधी ओलांडली नाही, अशा संपूर्ण मेळघाटातील कानाकोपऱ्यातून आणि प्रत्येक गावातून आलेल्या आदिवासी बांधवांनी थेट देशाची राजधानी गाठून ऐतिहासिक संसद भवनाला भेट दिली. अमरावतीचे खासदार बळवंतराव वानखडे आणि माजी मंत्री व आमदार ड. यशोमतीताई ठाकूर यांच्या अभिनव संकल्पनेतून मेळघाटातील या बांधवांचे 'संसद दर्शन' घडले. विशेष म्हणजे या दौऱ्यात मेळघाटातील प्रत्येक गावाचे प्रतिनिधित्व होते. या अविस्मरणीय सहलीमुळे मेळघाटातील आदिवासी बांधव भारावून गेले असून, त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी राबवलेला हा उपक्रम कौतुकाचा विषय ठरला आहे.अमरावती जिल्ह्यातील मेळघाट हा निसर्गरम्य असला तरी अतिशय दुर्गम भाग म्हणून ओळखला जातो. येथील अनेक नागरिक आजही बाहेरील जगापासून अलिप्त आहेत. अशा परिस्थितीत या बांधवांना देशाच्या लोकशाहीचे मंदिर पाहता यावे आणि जगाशी त्यांचा संपर्क वाढावा, यासाठी खासदार बळवंतराव वानखडे यांनी विशेष पुढाकार घेतला. त्यांच्या या प्रयत्नांमुळे मेळघाटातील प्रत्येक गावातील नागरिक थेट नवी दिल्लीतील संसद भवनात पोहोचले.

**प्रियंका गांधींशी अनौपचारिक संवाद**

या विशेष दौऱ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे, काँग्रेसच्या राष्ट्रीय सरचिटणीस तथा खासदार प्रियंकाजी गांधी आणि संघटन सरचिटणीस खासदार के.सी. वेणुगोपाल यांच्याशी झालेली भेट. खासदार वानखडे यांनी या बड्या नेत्यांशी आदिवासी बांधवांची प्रत्यक्ष भेट घडवून आणली. यावेळी आदिवासी बांधवांनी आपले गाऱ्हाणे आणि प्रेम या नेत्यांसमोर व्यक्त केले. इतक्या मोठ्या नेत्यांना समोर पाहून आणि भव्य संसद भवन पाहून उपस्थितांच्या चेहऱ्यावर एक वेगळेच समाधान पाहायला मिळाले.

**सांघिक प्रयत्नातून संकल्पना पूर्ण**

ही संकल्पना सत्यात उतरवण्यासाठी राज्याच्या माजी पालकमंत्री तथा आमदार ड. यशोमतीताई ठाकूर, काँग्रेसचे अमरावती ग्रामीण जिल्हाध्यक्ष बबलूभाऊ देशमुख आणि चिखलदरा काँग्रेस कमिटीच्या पदाधिकाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले. हा उपक्रम केवळ एक सहल नसून, दुर्गम भागातील जनतेला देशाच्या सर्वोच्च सभागृहाची ओळख करून देणारा एक 'सामाजिक पूल' ठरला आहे.मान्यवरांची उपस्थितीया ऐतिहासिक दिल्ली दौऱ्यात आणि संसद भेटीदरम्यान खासदार बळवंतराव वानखडे यांच्यासह माजी जि.प. सभापती दयारामजी काळे, चिखलदरा काँग्रेस कमिटीचे तालुकाध्यक्ष सहदेव बेलकर, धारणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती राहुल येवले, चिखलदरा अनु. जाती काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मेहपतसिंग उईके, संजयभाऊ बेलकर, राजेशभाऊ सेमलकर, मेळघाट विधानसभा युवक काँग्रेसचे अध्यक्ष पियुष मालवीय, नानकराम ठाकरे, तोताराम कास्देकर, सोनाजी कास्देकर, शिकारी बेठेकर, तसेच चिखलदरा काँग्रेस कमिटीचे इतर पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिवनगावमध्ये पुन्हा भूकंपाचे झटके नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ तिवसा**

तालुक्यातील शिवनगाव परिसरात पुन्हा एकदा भूकंपाचे सौम्य झटके जाणवल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. आज सकाळी १२.०७ वाजता हा झटका जाणवला. यापूर्वी २४ व २५ नोव्हेंबर रोजीही याच परिसरात भूकंपाचे झटके जाणवले होते. सलग काही दिवसांच्या अंतराने पुन्हा झटके जाणवत असल्याने ग्रामस्थांमध्ये चिंता वाढली आहे.

या आधी भूकंपाच्या पार्श्वभूमीवर जिओलॉजिकल (भूवैज्ञानिक) पथकाने शिवनगाव येथे भेट देऊन तपासणी केली होती. तसेच प्रशासकीय अधिकाऱ्यांनीही गावाला भेट देत परिस्थितीचा आढावा घेतला होता. मात्र या तपासणीनंतर भूकंपाच्या कारणाबाबत कोणतीही ठोस माहिती नागरिकांना देण्यात आलेली नाही. त्यामुळे ग्रामस्थांच्या मनातील संभ्रम अद्याप दूर झालेला नाही.दरम्यान, प्रशासनाने शिवनगाव व शिरजगाव मोझरी येथे भूकंप मापक यंत्र बसविण्यात येतील, असे आश्वासन दिले होते. मात्र अद्यापही ही यंत्रणा कार्यान्वित झालेली नाही. सतत भूकंपाचे झटके जाणवत असताना मापक यंत्र न बसविल्याने नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढत आहे. त्यामुळे ही यंत्रणा तातडीने बसवावी, अशी मागणी सरपंच धर्मराज खडसे व सामाजिक कार्यकर्ता प्रशांत कांबळे यांनी प्रशासनाकडे केली आहे.

### प्रशासनाने ठोस उपाययोजना कराव्यात

सातत्याने शिरजगाव, शिवनगाव येथे जमिनीत हादरे बसत आहे. हे भूकंपाचे आहेत की अजून कशाचे हे सांगण्यात प्रशासन असमर्थ ठरले आहे. दरवेळी प्रशासन फक्त पाहणी करून नागरिकांच्या तोंडाला पाने पुसत आहे. त्यामुळे यावेळीतरी प्रशासनाने ठोस उपाययोजना कराव्यात. अन्यथा यापुढे कोणताही अनुचित प्रकार घडल्यास त्याची जबाबदारी स्विकारण्याची तयारी ठेवावी. त्याशिवाय, तातडीने भूकंप मापक यंत्र बसवण्यात यावे. अन्यथा तहसील कार्यालयात येत्या ८ दिवसांनंतर ठिय्या आंदोलन करण्यात येईल.

**– प्रशांत कांबळे (सामाजिक कार्यकर्ता)**

# अमरावती महानगरपालिका निवडणूक काँग्रेसकडून इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती; १८ व १९ डिसेंबरला आयोजन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

अमरावती महानगरपालिका निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर अमरावती शहर (जिल्हा) काँग्रेस कमिटीच्यावतीने इच्छुक उमेदवारांच्या मुलाखतींचे आयोजन करण्यात आले आहे. शहरातील विविध प्रभागांतून इच्छुक उमेदवारांनी सादर केलेल्या अर्जांच्या आधारे या मुलाखती घेण्यात येणार असून, गुरुवार दिनांक १८ डिसेंबर २०२५ आणि शुक्रवार दिनांक १९ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजल्यापासून संध्याकाळी ४ वाजेपर्यंत या मुलाखती होणार आहेत.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या मार्गदर्शनानुसार यासाठी विशेष पार्लिमेंटरी बोर्ड स्थापन करण्यात आले आहे. या बोर्डामध्ये शहर काँग्रेस अध्यक्ष बबलु शेखावत यांच्यासह प्रभारी डॉ. झीशान हुसैन, खासदार बळवंत वानखडे, माजी पालकमंत्री श्रीमती यशोमतीताई ठाकूर, माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख, माजी महापौर विलास इंगोले, माजी महापौर मिलिंद चिमोटे, दिलीप एडतकर, भैय्या पवार, किशोर बोरकर, आसिफ तवक्कल, नजीर खान बी.के., शहर महिला अध्यक्षा जयश्रीताई वानखडे, निलेश गुहे, वैभव देशमुख, अब्दुल रफीक, संकेत साहू यांचा समावेश आहे.

हे पार्लिमेंटरी बोर्ड सर्व इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेऊन पक्षाच्या विचारधारेनुसार, जनतेशी नाळ जोडणारे, समर्पित व विकासाभिमुख उमेदवारांची निवड करणार आहे. या पारदर्शक प्रक्रियेद्वारे काँग्रेस पक्ष अमरावती शहराला मजबूत, समावेशक व न्यायपूर्ण नेतृत्व देण्याच्या दिशेने पुढे जात आहे.

काँग्रेस पक्ष समता, न्याय, धर्मनिरपेक्षता, सामाजिक समरसता तसेच गरीब, कष्टकरी, शेतकरी, महिला व युवकांच्या हितरक्षणासाठी कटिबद्ध आहे. आगामी महापालिका निवडणुकीत शहरातील पाणीपुरवठा, रस्ते व पायाभूत सुविधा, शिक्षण, आरोग्य सेवा, स्वच्छता, पर्यावरण संरक्षण, महिला सशक्तीकरण, युवकांसाठी रोजगार आणि वंचित घटकांसाठी न्यायपूर्ण योजनांवर विशेष भर देण्यात येणार आहे.

गुरुवार १८ डिसेंबर रोजी प्रभाग क्रमांक ३, ४, ५, ६, ८, ११, १४, १५, १६, २१ व २२ मधील उमेदवारांच्या, तर शुक्रवार १९ डिसेंबर रोजी प्रभाग क्रमांक १, २, ७, ९, १०, १२, १३, १७, १८, १९ व २० मधील उमेदवारांच्या मुलाखती होणार आहेत.

या मुलाखती काँग्रेस भवन, नवीन इमारत, शिवटेकडी (मालटेकडी बाजूला), अमरावती येथे होणार असून इच्छुक उमेदवारांनी आपल्या प्रभागानुसार निश्चित वेळेआधी उपस्थित राहण्याचे आवाहन काँग्रेस कमिटीने केले आहे.

# यवतमाळ रोडवर जलू गावाजवळ मध्यरात्री भीषण अपघात; दोघांचा जागीच मृत्यू






**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६नांदगाव खंडेश्वर**

अमरावती– यवतमाळ मार्गावर जलू गावाजवळ मध्यरात्री भीषण रस्ते अपघात झाला. भरधाव कार रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडावर आदळल्याने हा अपघात घडला. या दुर्घटनेत नांदगाव खंडेश्वर येथील दोन तरुणांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. अपघात इतका भीषण होता की कारचा समोरचा भाग पूर्णपणे चेंदामेंदा झाला असून वाहनाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.अपघाताची माहिती मिळताच लोणी टाकळी पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. पंचनामा करून मृतदेह ताब्यात घेण्यात आले व पुढील कारवाईसाठी रुग्णालयात पाठविण्यात आले. प्राथमिक तपासात वेगावर नियंत्रण सुटल्याने अपघात झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून मार्गावर काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती. लोणी टाकळी पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

# पृथ्वीराज चव्हाण जगातील सर्वात मोठे भविष्यवेत्ते, चंद्रशेखर बावनकुळे यांचा टोला



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

येत्या १९ डिसेंबरला देशात सर्वात मोठा राजकीय भूकंप होईल, भारताचा पंतप्रधान बदलेल आणि मराठी माणूस पंतप्रधान होईल, असे भाकीत माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी केले होते, त्यावर प्रतिक्रिया व्यक्त करताना महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी पृथ्वीराज चव्हाण हे जगातील सर्वात मोठे भविष्यवेत्ते आहेत, असा टोला लगावला आहे. ते अमरावतीत प्रसार माध्यमांशी बोलत होते.

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, पृथ्वीराज चव्हाण यांचा थोडा बुद्धिभ्रंश झाला आहे. त्यांना काहीही बोलण्याची सवय लागली आहे. कुठे पंतप्रधानपदाचे स्वप्न बघतात, कोण जाणार, कोण येणार, आता जगातील सर्वात मोठे भविष्यवेत्ते पृथ्वीराज चव्हाण हे झाले आहेत, असे मला वाटते.

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, राज्य निवडणूक आयोगाने महापालिका निवडणुकांचा कार्यक्रम घोषित केला आहे. या निवडणुकीत भाजप महायुती म्हणून सोबत लढणार आहोत. २९ महापालिकांमध्ये ५१ टक्के मते मिळवून दोन तृतियांश बहुमताने आम्ही जिंकू, असा आम्हाला विश्वास आहे. महायुतीतील घटक पक्षांसोबत प्रत्येक महापालिकानिहाय आमची चर्चा सुरू आहे. महायुती म्हणून एकत्रितपणे लढण्याचे संकेत भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी दिले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील महायुतीच्या संदर्भात बैठक घेतली आहे.

संबंधित जिल्ह्यातील पालकमंत्री आणि मंत्री हे देखील महायुतीच्या बैठका घेणार आहेत. महायुती १०० टक्के होईल, अशी स्थिती आहे. सर्वच महापालिकांमध्ये महायुती राहणार आहे, त्यामुळे स्वबळाचा आज तरी विचार नाही. ज्या निवडक ठिकाणी युती अशक्य असेल, त्या एक-दोन जागांवर मैत्रीपूर्ण लढत होऊ शकते, पण महापालिका निवडणुकांमध्ये महायुती होईल, असे स्पष्टपणे दिसत आहे. नगरपालिकांच्या निवडणुकीशी महापालिका निवडणुकीची तुलना करणे योग्य नाही, त्या ठिकाणी परिस्थिती वेगळी होती.

अमरावतीत आमदार संजय खोडके आणि आमदार रवी राणा यांच्यातील वादाविषयी विचारले असता, बावनकुळे म्हणाले, आम्ही आता एकत्र बसून चर्चा करू. प्रभागनिहाय चर्चा होईल. आजच कोणाला किती जागा मिळतील, हे सांगता येणार नाही. महायुतीच्या घटक पक्षातील नेत्यांसोबत प्रभागनिहाय चर्चा करू, तेव्हा या विषयावर मार्ग निघेल, असा मला विश्वास आहे. मुंबईत कोण एकत्र येईल आणि कोण वेगवेगळे लढेल, याला महत्व नाही. मुंबईतील जनता ही महाराष्ट्रातील डबल इंजिन सरकारच्या विकासाच्या धोरणासोबत उभी आहे. मुंबई विकसित करण्यासाठी मुंबई महापालिकेतही महायुतीची सत्ता मुंबईकरांना हवी आहे.

# डम्पर चोरीचा गुन्हा उघड; गुन्हे शाखेची कारवाई, १८ लाखांचा रेतीवाहक ट्रक जप्त




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

अमरावती शहर गुन्हे शाखेने गाडगे नगर पोलीस ठाण्यात दाखल डम्पर (रेती वाहक) चोरीचा गुन्हा उघडकीस आणत १८ लाख रुपये किमतीचा ट्रक जप्त केला आहे.दिनांक ११ डिसेंबर २०२५ रोजी फिर्यादी टिना विलास चव्हाण (महसूल अधिकारी) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, विनारॉयल्टी वाहतुकीप्रकरणी तहसील कार्यालय, अमरावती येथे कादेशीर कारवाईसाठी लावण्यात आलेला ट्रक क्रमांक चक-४०-ध-३१९३ आरोपी गजानन काळपांडे याने पार्किंगमधून चोरून नेला होता. या प्रकरणी गाडगे नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.या गुन्ह्याचा समांतर तपास करताना गुन्हे शाखेला गुप्त बातमीदाऱ्यामार्फत माहिती मिळाली की सदर ट्रक नांदगाव पेठ हद्दीतील रिवा हॉटेलजवळील युनिव्हर्सल मोटर्स येथे आहे. पथकाने तेथे जाऊन तपास केला असता ट्रक मिळून आला. चौकशीत ट्रक चालक सुनील लक्ष्मणराव भांबुरकर (रा. वलगाव) याने हा ट्रक मालक गजानन काळपांडे यांच्या सांगण्यावरून तहसील कार्यालयातून आणल्याचे कबूल केले.सदर ट्रक (चक-४०-ध-३१९३) जप्त करून, ट्रक चालकास पुढील कार्यवाहीसाठी गाडगे नगर पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे.ही कारवाई पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वात स.पो.नि. मनीष वाकोडे, पोहवा सतीश देशमुख, फिरोज खान, मंगेश लोखंडे, प्रशांत मोहोड, पोलीस नाईक नाझीमोद्दीन सैय्यद, पोलीस रणजित गावंडे, चालक अमंलदार प्रभात पोकडे व गुन्हे शाखेच्या पथकाने केली.

# अमरावती-मुंबई विमानसेवा आठवड्यातून दोनच दिवस!जानेवारीत होणार पुन्हा




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

अलायन्स एअरची मुंबई-अमरावती-मुंबई ही विमानसेवा दाट धुक्यामुळे १ ते १५ डिसेंबरदरम्यान बंद ठेवण्यात आली. आता विमानसेवा पूर्ववत सुरू झाली असली, तरी डिसेंबरमध्ये आठवड्यातून दोनच दिवस ही विमानसेवा उपलब्ध राहणार आहे. त्यातही वेळेत पुन्हा एकदा बदल करण्यात आला आहे. यापुर्वीही खराब हवामानामुळे विमानसेवा रद्द करण्यात आली आहे. २ जानेवारीपासून आठवड्यातून चार दिवस विमानोड्डाण होऊ शकेल, अशी माहिती अलायन्स एअरने दिली आहे. अलायन्स एअरने गेल्या २६ ऑक्टोबरपासून हिवाळी वेळापत्रकात महत्वपूर्ण बदल केले.

दुपारच्या ऐवजी सकाळी ९.१५ वाजता विमान उड्डाण सुरू झाले आणि सोमवार, बुधवार, शुक्रवार आणि रविवार असे चार दिवस ही विमानसेवा सुरू करण्यात आली. पुर्वीच्या वेळापत्रकानुसार मुंबईहून दुपारी ३.२५ वाजता उडणारे विमान हे सायंकाळी अमरावती विमानतळावर पोहचत होते आणि सायंकाळी ५.३५ वाजता मुंबईसाठी उड्डाण घेत होते आणि सायंकाळी ७.२० वाजता मुंबईत पोहचत होते. या वेळांमुळे प्रवाशांना दिवसभराची कामे करण्यासाठी वेळ मिळत नसल्याने ही विमानसेवा सोयीची नसल्याची तक्रार होती. त्यामुळे विमानसेवा सकाळी सुरू करण्यात आली.

**पुन्हा वेळेत बदल**

हवामानात सातत्याने होणारा बदल आणि दाट धुक्यामुळे दृश्यमानतेच्या समस्यांनी विमानसेवेला फटका बसत आहे. त्यामुळे मुंबई-अमरावती-मुंबई विमानसेवा आठवड्यातून दोनच दिवस सुरू राहणार आहे. सोमवार, शुक्रवार असे दोन दिवस प्रवाशांना मुंबई ये-जा करता येणार असून, अमरावती विमानतळावरून मुंबईच्या दिशेने दुपारी २ वाजून १५ मिनिटांनी झेपावेल, असे नवे वेळापत्रक संकेतस्थळावर जारी करण्यात आले आहे. धुक्यामुळे दृश्यमानता कमी झाल्यामुळे यापूर्वी १ ते १५ डिसेंबर यादरम्यान अमरावती-मुंबई विमानसेवा रद्द करण्यात आली होती. त्यामुळे प्रवाशांमध्ये प्रचंड नाराजीचा सूर होता. आता अलायन्स एअर कंपनीने वेळेत बदल आणि आठवड्यातून दोनच दिवस विमानसेवा देण्याचा निर्णय घेतला आहे. मुंबईहून अमरावती विमानतळावर विमान दुपारी १ वाजून ५० मिनिटांनी पोहोचेल. वातावरणात बदलामुळेच विमान सेवेच्या वेळेत बदल करण्यात आल्याची बाबदेखील स्पष्ट करण्यात आली आहे.

**२ जानेवारीपासून खरच होणार का पूर्ववत?**

येत्या २ जानेवारीपासून पुन्हा वेळेत बदल करण्यात येऊन अमरावतीहून सकाळी ९.१५ वाजता विमान उड्डाण घेऊ शकेल आणि रविवार, सोमवार, बुधवार आणि शुक्रवार असे चार दिवस विमानसेवा सुरू राहील, असे संकेतस्थळावर स्पष्ट करण्यात आले आहे. जानेवारीतील बुकिंग देखील सुरू करण्यात आले आहे.मात्र तरीही नागरिकांचा या वर विश्वास बसत नाही आहे.

# तब्बल बारा वर्षांनंतर वाघाच्या शिकाऱ्याला अटक, मेळघाट व्याघ्रप्रकल्प प्रकरण



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ अमरावती**

मेळघाट व्याघ्रप्रकल्प परिसरात २०१३ साली वाघांच्या शिकारीचे मोठे सत्र उघडकीस आले. त्यावेळी मेळघाट वनविभागाने अतिशय उत्तम कामगिरी पार पाडत या संपूर्ण प्रकरणाचा छडा लावला. शेकडो आरोपींना अटक करण्यात आली आणि अनेकांना शिक्षाही झाली. तत्कालीन वनाधिकारी विशाल माळी यांच्या संकल्पनेतून त्यावेळी मेळघाट वन्यजीव गुन्हे नियंत्रण शाखा स्थापन करण्यात आली, जी आजही वाघांच्या शिकार प्रकरणात उत्कृष्ट कामगिरी करत आहे.

मेळघाट व्याघ्रप्रकल्पाअंतर्गत २०१३ साली उघडकीस आलेल्या वाघांच्या शिकार प्रकरणातील फरार शिकाऱ्याला तब्बल १२ वर्षांनंतर अटक करण्यात आली. वन्यजीव गुन्हे नियंत्रण शाखा मेळघाट यांनी ही महत्त्वपूर्ण कारवाई केली. दोन वर्षांपूर्वी याच शाखेने आणखी एका शिकाऱ्याला अटक केली होती. न्यायालयात त्याच्यावरील आरोप सिद्ध झाले होते. अकोट वन्यजीव विभागाच्या कार्यक्षेत्रात २०१३ साली वाघ शिकार प्रकरणातील फरार शिकारी शीतलाबाई उर्फ गजेंद्रीबाई हिला मध्यप्रदेशातील मंडला येथून यशस्वीरीत्या अटक करण्यात आली.

वन्यजीव संरक्षण कायदा १९७२ अंतर्गत तिच्यावर गुन्हा नोंदवण्यात आला. ही महत्त्वपूर्ण कारवाई वन्यजीव गुन्हे नियंत्रण शाखा, मेळघाट व्याघ्र प्रकल्प तसेच अकोट वन्यजीव विभाग यांच्या संयुक्त व समन्वयात्मक प्रयत्नातून पार पडली. या प्रकरणाचे तपास अधिकारी गणेश टेकाळे असून ही कारवाई मेळघाट व्याघ्रप्रकल्पाचे क्षेत्रसंचालक व वनसंरक्षक आदर्श रेड्डी तसेच अकोट वन्यजीव विभागाचे उपवनसंरक्षक राहुल टोलिया यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आली. वन्यजीव गुन्हे नियंत्रण शाखेच्या चमूत विशाल बन्सोड, स्वप्नील राऊत, दिनेश केंद्रे, विशाल उमाटे, अनंता नायसे, विशाल सुरत्ने यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

अटकेतील शिकाऱ्याला अकोट प्रथम श्रेणी न्यायालयासमोर हजर करण्यात आले असताना त्याला तीन दिवसांची वनकोठडी मंजूर करण्यात आली होती. त्यानंतर न्यायालयाने शिकाऱ्याला २६ डिसेंबरपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. दीर्घकाळ फरार असलेल्या आरोपीचा शोध घेऊन तिला अटक करणे ही वन्यजीव संरक्षणाच्या दृष्टीने अत्यंत उल्लेखनीय कामगिरी असून, सदर अटकेमुळे वन्यजीव गुन्ह्यांविरोधातील कारवाईस अधिक बळ मिळाले आहे. वन्यजीव संरक्षणासाठी अशा प्रकारच्या संयुक्त व प्रभावी कारवाया भविष्यातही अधिक तीव्रतेने राबविण्यात येतील, असे संबंधित विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.


आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत